दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३३४ । बुधवार १७ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com




# जरांगे पाटलांचा श्रीगोंदा मुक्काम अधांतरी !

## ■ पाटोद्यात प्रकृती खालावली, श्रीगोंद्यात हजारोंच्या स्वागताची तयारी
## ■ बाजारतळावर व्यासपीठ, पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज १९वा दिवस आहे. सरकारकडून मागण्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूच करण्याची हाक दिल्यानंतर काल आंतरवाली सराटी येथून आंदोलनकर्त्यांचा ताफा मुंबईच्या दिशेने रवाना झाला. रात्री उशिरा बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे मुक्काम केल्यानंतर आज त्यांचा श्रीगोंद्यात मुक्काम होणार असल्याने तालुक्यात जय्यत तयारी करण्यात आली होती. मात्र, उपोषणामुळे पाटोद्यात जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याने श्रीगोंद्याकडे त्यांचे आगमनच अधांतरी झाले आहे.

पाटोदा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रकृतीची स्थिती लक्षात घेऊन त्यांना अतिदक्षता विभागात तातडीने उपचार घेण्याचा सल्ला दिल्याची माहिती आहे. त्यामुळे सायंकाळी सहा वाजेपर्यंत ते पाटोद्यातून श्रीगोंद्याच्या दिशेने रवाना झाले नव्हते. परिणामी, जरांगे पाटील श्रीगोंद्यात येणार की पाटोद्यातच थांबणार? याबाबत तालुक्यात दिवसभर चर्चेला उधाण आले.

दरम्यान, त्यांच्या स्वागतासाठी श्रीगोंदा तालुका सज्ज झाला आहे. शहरातील चौकाचौकांत स्वागताचे फलक झळकले असून, विविध ठिकाणी सत्काराची तयारी करण्यात आली आहे. आढळगाव येथील सिद्धेश्वर मंदिर तसेच बालाजी मंगल कार्यालयात हजारो आंदोलनकर्त्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्रीगोंदा बाजारतळ येथे संभाव्य मुक्कामासाठी व्यासपीठ उभारण्यात आले आहे. मुंबईच्या दिशेने निघालेल्या आंदोलनकर्त्यांच्या वाहनांमधून मोठ्या प्रमाणात शिधा आणण्यात आला असून, काही वाहनांमध्ये १५ दिवस पुरेल एवढा शिधा असल्याचे सांगण्यात येत आहे.

जरांगे पाटील यांच्या संभाव्य आगमनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनानेही मोठी तयारी केली आहे. शहरात दिवसभर पोलिसांची पेट्रोलिंग सुरू असून, विविध पथके तैनात करण्यात आली आहेत.

त्यामुळे एका बाजूला हजारोंच्या स्वागताची जय्यत तयारी आणि दुसऱ्या बाजूला पाटोद्यात खालावलेली जरांगे पाटील यांची प्रकृती, अशा स्थितीत श्रीगोंद्याचा नियोजित मुक्काम अखेर होणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.




### सलाईन घेतले, मुंबईला जाणारच...

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज १९ वा दिवस असून सध्या ते बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे आहेत. उपोषणामुळे अशक्तपणा आल्याने त्यांनी पाटोद्यात सलाईन घेतले असून पाणीही प्यायल्याचे त्यांनी स्वत: सांगितले. डॉक्टरांकडून जरांगे पाटलांच्या प्रकृतीची तपासणी केली जात असून त्यांनी प्रवास करु नये असा सल्लाही देण्यात आला आहे. मात्र, जरांगे पाटील आपल्या मुंबई दौऱ्यावर ठाम असून उद्या आपण मुंबईसाठी रवाना होणार असल्याचं त्यांनी म्हटलं. मी मुंबईला जाणार आहे, थांबणार नाही, मुंबईसाठी मी उद्या दुपारी निघणार. आज मला जाता आला नाही, आजच्या ऐवजी मी उद्या दुपारी १ नंतर मुंबईला जाणार आहे, अशी माहिती जरांगे पाटलांनी पत्रकार परिषदेतून दिली.

## मुंबईतील नियोजित आंदोलन मागे घ्या; विखे- पाटील यांचे जरांगेंना आवाहन

**लोणी :** गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतीन नियोजित आंदोलन मागे घ्यावे. संवाद आणि चर्चे द्वारे प्रश्न सोडवता येऊ शकतात, असे आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बुधवारी आंदोलक मनोज जरांगे यांना केले. आंदोलन रोखण्यासाठी बळाचा वापर करण्याची कोणतीही योजना नाही. ज्यांनी आरक्षणाच्या मुद्द्याचा अभ्यास केला आहे, त्यांच्याशी चर्चा करत आहोत, असे विखे पाटील म्हणाले.



त्यांनी सांगितले की, जेव्हा गरज असेल तेव्हा समाज आणि त्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यास सरकार तयार आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर समाजाकडून केल्या जाणाऱ्या टीकेचाही उल्लेख केला. काही सदस्यांना वाटते की, शिंदे यांनी त्यांचा विश्वासघात केला. मला वाटते की त्यांनी ही भावना बाजूला ठेवली पाहिजे. शिंदे यांनी या मुद्द्यावर बराच पुढाकार घेतला होता.

न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता असूनही त्यावेळी सुमारे ५,५०० मुलांना संधी देण्यात आली होती आणि एसईबीसी प्रक्रियाही सुरू करण्यात आली होती. अनेक गोष्टी केल्या गेल्या. आपली फसवणूक झाली आहे किंवा विश्वासघात झाला आहे, असे वाटल्याने सम ाजाचा काही फायदा होईल असे मला वाटत नाही, असे ते म्हणाले. सरकारने समाजाच्या भावनांचा आदर करत अनेक योजना सुरू केल्या होत्या.

आमची एवढीच अपेक्षा आहे की, गणेशोत्सवादरम्यान भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये.जरांगे पुण्याहून मुंबईला प्रवास करणार आहेत आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये अशी आमची इच्छा आहे. सुरू असलेल्या उत्सवाचा विचार करून जरांगे यांनी आंदोलन थांबवावे, असे आवाहन त्यांनी केले.

जरांगे सध्या मुंबईच्या दिशेने प्रवास करत आहेत. मात्र, दीर्घकाळ प्रवास आणि उपोषण यामुळे उद्भवलेल्या आरोग्याच्या समस्यांमुळे आपला दौरा रद्द होऊ शकतो, असे त्यांनी **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### वेस्ट इंडिजच्या दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या वनडे आणि टी २० संघ

मुंबई : बीसीसीआयनं वेस्ट इंडिज विरोधातील वनडे आणि टी २० मालिकेसाठी भारताचे संघ जाहीर केले आहेत. वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचं कर्णधारपद शुभमन गिलकडे असेल. तर टी २० मालिकेसाठी भारताचे नेतृत्व श्रेयस अय्यर याच्याकडे असेल.भारताच्या वनडे संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेमुळं काही खेळाडू उपलब्ध नसल्यानं आकिब नबी आणि नमन धीर यांना संधी मिळाली आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर करण्यात आला आहे. शुभमन गिलकडे कर्णधारपद, तर केएल राहुलकडे उपकर्णधारपद आणि यष्टिरक्षकाची जबाबदारी देण्यात आली आहे. ध्रुव जुरेलचा देखील यष्टिरक्षक म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे. या संघात रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज यांच्यासह युवा खेळाडूंनाही संधी मिळाली आहे.

## कांदा पुन्हा तेजीत...
# आवक वाढूनही दमदार भाववाढ
### राहात्यात क्विंटलला ५,८००; ओतूरमध्ये १० किलोला ५२१ रुपयांचा कमाल भाव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर / जुन्नर :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी सध्या बाजारातील चित्र काहीसे दिलासादायक बनले आहे. आवक वाढलेली असतानाही कांद्याच्या दरात फारशी घसरण न होता चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. राहाता बाजार समितीत मंगळवारी तब्बल ४ हजार ६८४ गोण्यांची आवक झाली. त्यात कांद्याला कमाल ५ हजार ८०० रुपये



प्रतिक्विंटल भाव मिळाला. एक नंबर कांद्याला ४ हजार ५०० ते ५ हजार ८०० रुपये दर मिळाला.

ओतूर उपबाजारातील रविवारी झालेल्या लिलावातही कांद्याला चांगला प्रतिसाद मिळाला. येथे २० हजार ४३८ पिशव्यांची आवक झाली असून गोळा कांद्याला ४७० ते ५२१ रुपये प्रति १० किलो, म्हणजेच कमाल सुमारे ५ हजार २१० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. सुपर कांद्याला ४२० ते ४८० रुपये, तर गोल्टी/गोल्टा कांद्याला २०१ ते ४०० रुपये प्रति १० किलो दर मिळाला. सणासुदीच्या पार्श्वभूम ीवर मागणीत वाढ होत असल्याने बाजारात कांद्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते. मात्र आवक वाढल्यास दरावर दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाजारातील रोजचे दर, आवक आणि मागणीचा कल लक्षात घेऊन विक्रीचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे.विशेषतः चांगली प्रत, मोठा आकार, घट्टपणा, टिकाऊपणा आणि साठवणक्षम कांद्याला अधिक दर मिळत आहेत. त्यामुळे घाईघाईने संपूर्ण माल विकण्याऐवजी मालाची प्रतवारी करून टप्प्याटप्प्याने विक्री करणे फायदेशीर ठरू शकते. मात्र साठवणूक करताना कांद्याची गुणवत्ता, साठवण खर्च आणि बाजारातील पुढील संभाव्य चढ-उतार यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

## मराठा आरक्षण : शिंदे समितीचा दरमहा निधी बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे मुंबईकडे येत असताना आरक्षणाच्या अनुषंगाने प्रम ाणपत्रांच्या कार्यपद्धतीसंदर्भात काम करणाऱ्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीच्या कामकाजाला राज्य सरकारने प्रशासकीय स्वरूप दिले आहे. समितीच्या कामकाजासाठी मंत्रालयात स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. समितीच्या बैठकीनुसार मानधनाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र बुधवारी जाहीर करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकाद्वारे समितीच्या अध्यक्षांना दरमहा देण्यात येणारे चार लाख रुपये निश्चित मानधन देण्याची तरतूद वगळण्यात आली.

सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी तीन स्वतंत्र शासन निर्णय जारी केले. पहिल्या निर्णयानुसार नवीन प्रशासन भवनाच्या १२ व्या मजल्यावरील ऊर्जा विभागाला पूर्वी देण्यात आलेली जागा आता न्या. शिंदे समिती आणि मराठा आरक्षण कक्षाला देण्यात आली आहे. समिती व कक्षाचे कामकाज संपल्यानंतर ही जागा पुन्हा ऊर्जा विभागाकडे देण्यात येणार आहे.

दुसऱ्या शासन निर्णयात समि तीच्या बैठकींसाठी मानधनाची पद्धत स्पष्ट करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्यक्ष अथवा दूरचित्र माध्यमातून घेण्यात **(पान ४ वर)**

## भारत-पाकिस्तानच्या युद्धनौका एकमेकांना धडकल्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** अरबी समुद्रात भारतीय आणि पाकिस्तानी नौदलाच्या जहाजांची टक्कर झाली. ही घटना उत्तर अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत घडली. भारताच्या म्हणण्यानुसार, नियमित देखरेख मोहिमेवर असलेले पाकिस्तानी जहाज अति वेगाने भारतीय युद्धनौकेच्या जवळ आले आणि त्याने धोकादायक पद्धतीने आपला मार्ग बदलला. या घटनेदरम्यान दोन्ही जहाजांची टक्कर झाली. या घटनेत कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. सूत्रांनुसार, टक्कर झालेले पाकिस्तानी जहाज पीएनएस हुनैन आहे. हे पाकिस्तान नौदलाचे यारमौक-श्रेणीतील सागरी गस्ती जहाज असून, त्याचा वापर सागरी देखरेख आणि गस्तीसाठी केला जातो. टक्कर झालेल्या भारतीय नौदलाच्या जहाजाची ओळख अद्याप पटलेली नाही.

### पाकिस्तानकडून ३५ वर्षे जुन्या कराराचा भंग

यानंतर, भारताने नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयाच्या प्रभारी दूतांना बोलावून तीव्र निषेध नोंदवला. भारताने पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाचे वर्तन अस्वीकार्य आणि अव्यावसायिक असल्याचे म्हटले आहे. एएनआयच्या वृत्तानुसार, भारतीय नौदलाचे एक युद्धपोत उत्तर अरबी समुद्रात नियमित देखरेख मोहिमेवर असताना, पाकिस्तानी नौदलाचे एक जहाज अति वेगाने भारतीय जहाजाच्या दिशेने आले. पाकिस्तानी जहाजाने मार्ग बदलणे हे असुरक्षित आणि अव्यावसायिक असल्याचे म्हटले जात आहे. त्यानंतर, दोन्ही जहाजांमधील अंतर हळूहळू कमी होत गेले आणि अखेरीस त्यांची टक्कर झाली. या धडकेत कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. तथापि, दोन्ही जहाजांची नावे आणि धडकेचे नेमके ठिकाण अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही.

भारताने म्हटले आहे की, पाकिस्तानी जहाजाची ही कृती एप्रिल १९९१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या कराराच्या कलम १० चे उल्लंघन आहे. दोन्ही देशांनी आधीच सहमती दर्शवली आहे की त्यांची युद्धपोते आणि पाणबुड्या आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत एकमेकांच्या खूप जवळ येणार नाहीत. जहाजांची टक्कर आणि इतर सागरी अपघात टाळण्यासाठी हे केले जाते. हा करार दोन्ही देशांच्या लष्करी कारवायांवर नियंत्रण ठेवणारे अनेक नियम स्थापित करतो. यामध्ये लष्करी कवायती आणि सैन्याच्या हालचालींची पूर्वसूचना देण्याच्या नियमांचा समावेश आहे. याशिवाय, समुद्रातील युद्धनौका आणि पाणबुड्यांमधील अंतराबाबतही नियम निश्चित करण्यात आले आहेत

## अफवांचा धुराळा बंद करा...

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** दिशा सालियन यांना कधीही भेटलेलो नाही. राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या ६ वर्षांपासून वारंवार ह्या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझं नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरु आहे, असा आरोप शिवसेनेचे युवा नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सीबीआयकडून चौकशी करण्यात येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली. कुठलंही तथ्य आणि सत्य नसलेलं हे सततचं खोटं कँपेन दुर्दैवी आहे. अधिकृत यंत्रणांना कुठल्याही व्यत्ययाशिवाय, राजकीय हस्तक्षेपाशिवाय, चारित्र्यहननाशिवाय आणि निःपक्षपातीपणे पुन्हा एकदा नव्याने ही चौकशी करु द्या. परत एकदा सांगतो, ज्यांना वाटत असेल की अश्या चारित्र्यहननाच्या आणि खोट्या प्रचाराच्या मार्गाने तुम्ही आम्हाला शांत बसवू शकाल तर तो तुमचा भ्रम आहे. सत्यासाठी, अन्यायाविरुद्ध, देशवासीयांना सोबत घेऊन आमचा लढा सुरुच राहील! असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

# दुष्काळात वीजेचा तेरावा महिना!
## वीजपुरवठ्याच्या खेळखंडोब्याने संतप्त शेतकऱ्यांचे भोकर सबस्टेशनला कुलूप; रात्री ठिय्या आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** पावसाने हुलकावणी दिल्याने खरीप पिके हातातून जाण्याची भीती निर्माण झाली असतानाच, वीजपुरवठ्याच्या सततच्या खंडितपणामुळे श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. महिनाभरापासून वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याच्या निषेधार्थ मुठेवाडगाव येथील संतप्त शेतकऱ्यांनी बुधवारी (दि. १६) रात्री सुमारे १० वाजता भोकर वीज उपकेंद्राला कुलूप ठोकून ठिय्या आंदोलन सुरू केले.

श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांना भोकर सबस्टेशनमधून वीजपुरवठा केला जातो. मात्र गेल्या महिनाभरापासून वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना म ोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### नेवाशाच्या आमदाराचा दबाव, श्रीरामपूरचे काय?

आंदोलन सुरू होताच नेवासा येथुन १०४५ लाख वीज पुरवठा सुरू झाला. ओव्हर लोडमुळे आम्ही भोकर सबस्टेशन वीज पुरवठा खंडित केला होता, असे कारण सांगितले. मात्र नेवाशाला उच्च दाबाने सुरळीत वीज देण्यासाठी श्रीरामपूर तालुक्यातील पूर्व भागावर अन्याय केला जात असल्याचा शेतकऱ्यांचा संशय आहे. नेवासाचे आमदार त्यांच्या कार्यक्षेत्राला उच्च दाबाने वीज पुरवठा मिळण्यासाठी वीज प्रशासनावर दबाव आणतात मग श्रीरामपूरच्या आमदार काय करतात? असा संतप्त सवाल यावेळी शेतकऱ्यांनी केला.



पावसाअभावी खरीप पिके सुकत असताना, ज्या विहिरी व बोअरवेलमध्ये पिकांना जीवदान देण्याइतके पाणी उपलब्ध आहे, ते पाणीही विजेअभावी पिकांना देता येत नसल्याची परिस्थिती आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे. परिसरातील वस्त्यांवर बिबट्याचा वावर असल्याने अंधारात शेतात जाणेही धोकादायक बनले आहे. त्यामुळे 'दुष्काळात वीजेचा तेरावा महिना' अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

बुधवारी रात्री सुमारे ९.४० वाजता शेती वाहिनीचा वीजपुरवठा बंद झाल्यानंतर संतप्त शेतकरी भोकर सबस्टेशनवर दाखल झाले. त्यावेळी सहायक अभियंता सुरेश परमार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. ते 'नॉट रिचेबल' असल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढला. सबस्टेशनवर चार कर्मचारी ड्युटीवर होते. कर्मचाऱ्यांनी सहायक अभियंता परमार यांच्याशी संपर्क करून दिल्यानंतर नेवासा येथील १३३ केव्ही केंद्रातून वीजपुरवठा बंद असल्याचे आणि तो कधी सुरू होईल हे निश्चित सांगता येत नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी कर्मचाऱ्यांना **(पान ४ वर)**

# बिबट्याचं स्थलांतर..




बिबट्याचं रस्त्यावर दिसणं हा कुतूहलाचा विषय ठरतो. बिबट्या आल्याच्या बातम्या येतात, त्यावर चर्चा होते; पण त्यांच्या स्थलांतराची कारणमीमांसा होत नाही. निसर्ग निर्मात्यांनी निर्माण केलेलं जिवसृष्टीचं सहजीवन टिकवायचं असेल, तर बिबट्यासह वन्यप्राण्यांच्या जंगलापासूनच्या स्थलांतराचं उत्तर शोधावंच लागेल. अन्यथा आज अन्न व पाण्यासाठी जी वेळ त्या मुक्या जीवावर आली आहे, ती कधीही आपल्या जीवावर उठेल.

'बिबट्या आला रे आला!' हे आता सर्वत्रच झालंय. दररोज कुठेना कुठे बिबट्या आढळला, अशा बातम्या वृत्तपत्रातून झळकतात. त्यावर चर्चा होते आणि नंतर बिबट्याचा विसर पडतो. खरं तर बिबट्याचं हमरस्त्यावर, शेतीवाडीत, मानवीवस्तीत आणि अगदी मुंबईसारख्या शहरात आढळणं, हा कौतुकाचा, कुतूहलाचा विषय नसून, तो चिंतनाचा व अभ्यासाचा विषय आहे. जंगल हे बिबट्याचं रहिवासस्थान. हे रहिवासस्थान सोडून, बिबट्या जंगलातून स्थलांतरित का होतोय, या प्रश्नाची उकल करणे गरजेचे आहे. केवळ बिबट्याच नाही, तर अनेक वन्यजीव जंगल सोडून स्थलांतरित होत आहेत. बिबट्या हा कुतूहलाचा प्राणी असल्याने, त्याला प्रसिद्धी मिळते इतकंच. प्राण्यांचं होत असलेले स्थलांतरच उत्तर शोधणं जिवसृष्टीच्या सहजीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. दुर्दैवाने शासन आणि वन विभाग यांची उदासीनता आणि आपणही तितकेच जबाबदार आहोत.

निसर्गानं वसुंधरेला जंगलसृष्टीचं लेणं दिलं. जंगलसंपत्ती म्हणजे केवळ झाडं झुडपं नव्हे, तर प्राणी, पशू, पक्षी, किटक, पाणी आणि हवा यांचं आगार. जंगल म्हणजे प्राणवायू निर्मितीचा कारखाना. प्राणी, पशू, पक्षी, किटक यांचा निवारा आणि उदरनिर्वाहाचं साधन. मानवांनी जंगल सोडलं. जंगलाशी जुळलेली नाळ तोडली. जंगलाची आणि मानवाची जेव्हा ताटातूट झाली, तेव्हन जंगल संपत्तीच्या वाताहतीचा आरंभ झाला! जंगलातून बाहेर पडल्यावर, त्यांनी निसर्गनिर्मित सृष्टी विसरून, स्वतःची वेगळी सृष्टी निर्माण केली. ह्या वेगळ्या सृष्टीची निर्मिती करताना त्याला संवेदनशीलता, सृजनशीलता आणि सर्जनशीलतेचा विसर पडला. प्रगती आणि सुखाची आस लागलेल्या आणि सृष्टीवरच नवी सृष्टी उभारण्याचा ध्यास घेतलेल्या अहंकारी मानवाने, जंगलसंपत्तीची लयलूट केली. सिमेंटचं जंगल उभारण्यासाठी जंगलाची कत्तल झाली.

कारखानदारांनी प्रदूषणाचं संकट उभं केलं. कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूंनी हवा प्रदूषित केली. रासायनिक प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यां नद्यांचं पाणी नासून टाकलं. प्रदूषणामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. निसर्ग विकृत बनला. अतिवृष्टी, गारपीट, हिमवर्षाव, रासायनिक पाऊस, वाढते तापमान, चक्रीवादळे आणि दुष्काळ असे दुष्टचक्र सुरू झाले. तरी मानवाने आपले नागरीकरण आणि औद्योगिकीकरणाचं रहाट सुरूच ठेवलं. प्रदूषणाची आणि निसर्गाच्या विकृतीची झळ, जंगल आणि त्यातील जिवसृष्टीला बसू लागली. पर्यावरणाच्या दृष्टीने एकूण भौगोलिक क्षेत्राच्या किमान ३३ टक्के क्षेत्र हे जंगलाखाली असावे असे मानले जाते. केवळ आपल्या देशाचा विचार करायचा, तर देशातील जंगलाखाली केवळ १० टक्के क्षेत्र उरलंय! यावरून आपण जंगलाचा किती सत्यानाश केला आहे, याची कल्पना यावी.

मानव नावाच्या कसायाने नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि चंगळवाद ह्या त्रिमूर्तीने जंगल आणि त्यातील जीवसृष्टीसाठी कत्तलखाना सुरू केला. जंगलं तुटत गेली. जंगलातल्या प्राणी, पशू, पक्षी, किटक यांच्यापुढे उदरनिर्वाहाची 'समस्या' उभी ठाकली. जंगलातली अन्न पुरवणारी झाडे संपली. जंगलातील पाण्याचे स्रोत आटू लागले. पाण्याचे साठे कोरडे पडू लागले. मांसाहारी प्राण्यांना शिकारीसाठी प्राणी मिळेना. कारण जंगलाच्या ऱ्हासाबरोबर वन्यजीवांची संख्याही घटली. माणसाची रोजगार आणि उदरनिर्वाहासाठी जशी वणवण होत आहे, तशीच जंगलातल्या प्राण्यांची अन्न व पाण्यासाठी तडफड होतू लागली. 'उदरनिर्वाह' कारणास्तव माणूस जसा गावाकडून शहराकडे स्थलांतरित झाला, तसेच जंगलातले प्राणीही अन्न व पाण्याच्या शोधासाठी जंगलातून बाहेर पडले!

पूर्वी जे फक्त जंगलातच दिसत होते, ते आता हमरस्त्यावर, गावात आणि शहरात दिसायला लागलंय. बिबटे, वाघ, हरणं, काळविटं, रानडुक्कर, ससे, कोल्हे, राजरोसपणे मानवी वस्तीत वावरताना दिसू लागले. वन्य जीव हे काही पर्यटनासाठी बाहेर पडलेले नाहीत, तर ते जगण्याचा लढा देण्यासाठी जंगल सोडत आहेत! तहान आणि भुकेने त्यांना भटकंती करण्यास मजबूर केलंय. जंगलंच उरली नाहीत, तर तहान आणि भूक भागवायची कशी, या प्रश्नांच उत्तर शोधण्यासाठी जंगलातल्या जीवसृष्टीला स्थलांतर करण्यास भाग पाडलं.

भुकेल्या, तहानलेल्या जीवांनी जंगलात परतावं, यासाठी मानवाला पुन्हा जंगलाकडे वळावं लागणार आहे. भोगवाद आणि चंगळवादात बुडालेला मानव, आता यातून सबक काढून जंगलसंस्कृतीचा आणि जंगलसृष्टीचा विचार करावा लागणार आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा', 'पाणी आडवा, पाणी जिरवा', याच बरोबर 'जंगले वाढवा आणि वन्यजीवन वाचवा' असेही म्हणावे लागेल. त्यासाठी मानवनिर्मित जंगलांचं प्रमाण वाढवावं लागेल. बिबट्या आणि वन्यजीवांच्या स्थलांतराची शोधयात्रा ही अशी आहे. जंगलामधूनच स्थलांतर थांबणारचं तर त्यासाठी मानवाला पुन्हा जंगलाकडे जावं लागणार आहे. तिथल्या नुकसानीची भरपाई करून मुक्या जीवांची भूक व तहान या साठीची भटकंती संपवावी लागेल. अन्न व पाणी जंगलातच मिळेल, अशी व्यवस्था करावी लागेल. असं झालं, तरच वन्यजीवांचं स्थलांतर थांबेल आणि निसर्गाचं अपेक्षित सहजीवन पुन्हा अस्तित्वात येईल.

# साईबाबा हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जरी विभागासाठी अत्याधुनिक उपकरणांची भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी. :** श्री साईबाबा संस्थान संचालित श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जरी विभागासाठी सुमारे ४९ लाख किंमतीची 'हाय स्पीड ड्रिल सिस्टीम फॉर न्यूरोसर्जरी' ही अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणाची भेट देण्यात आली आहे. प्रिजमा ग्लोबल लिमिटेडच्या वतीने कंपनीचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम अय्यर यांच्या हस्ते ही भेट देण्यात आली.

श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा श्री साईबाबा हॉस्पिटलचे अध्यक्ष यांच्या हस्ते या उपकरणाचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रितम वडगावे, न्यूरोसर्जन डॉ. संतोष उनवणे, डॉ. विश्वनाथ कामतगी, बायोमेडिकल इंजिनिअर तृप्ती सिताम, कांबळे, कार्तिक पांगारकर, सहायक आधिसेविका मंदा थोरात, तसेच हॉस्पिटलमधील इतर डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

न्यूरोसर्जरीमध्ये मेंदू आणि मज्जासंस्थेशी संबंधित गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांचा समावेश होतो. या शस्त्रक्रियांसाठी हे अत्याधुनिक उपकरण अतिशय उपयुक्त ठरणार आहे. गुंतागुंतीच्या आजारांवर अधिक प्रभावीपणे उपचार करण्यासाठी आणि शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी हे उपकरण अधिक मदतगार ठरणार आहे.

# मुक्या जनावरांचा तळतळाट घेऊ नका

## नगरसेवक बाळासाहेब रुईकर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**0कोळपेवाडी :** कोपरगाव शहरातील बाजारतळ परिसरातील नगरपरिषदेच्या कोंडवाड्यात आजारी गाईची अत्यंत बिकट अवस्था झाल्याचे निदर्शनास आले. या कोंडवाड्यात चारा व पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नसल्याचा आरोप नगरसेवक बाळासाहेब रुईकर यांनी केला असून, प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा निषेध केला आहे.

गाय गंभीर आजारी व जखमी अवस्थेत पडून असल्याची माहिती मिळताच रुईकर यांनी घटनास्थळी धाव घेत डॉक्टरांना बोलावून तिची तपासणी केली. गेल्या अनेक दिवसांपासून गाय पडून असल्याने तिची प्रकृती चिंताजनक बनली आहे. तिला उभे करण्यासाठी आवश्यक असलेली पाळणासदृश सुविधा उपलब्ध नसल्याने उपचारात अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कोंडवाड्यात जनावरांसाठी ठेवलेले पाणी अत्यंत घाण असल्याचे तसेच पाणी पाजण्यासाठी साधी बादलीही उपलब्ध नसल्याचे रुईकर यांनी सांगितले. यापूर्वी याच कोंडवाड्यात दोन गाईंचा मृत्यू झाल्याचा दावाही त्यांनी केला. पालिकेने शहरातून अनेक मोकाट जनावरे पकडल्याचे सांगितले होते; मात्र कोंडवाड्यात केवळ एकच गाय आढळल्याने उर्वरित जनावरे कुठे गेली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

आजारी गाईच्या उपचारासाठी तातडीने ठोस उपाययोजना करावी, तसेच मोकाट जनावरांच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा. मुक्या जनावरांचा तळतळाट घेऊ नका, अशी विनंती रुईकर यांनी नगरपरिषद प्रशासन व सत्ताधाऱ्यांना केली.

# डॉ. सोमनाथ गिते यांचा शालिनीताई विखे यांच्या हस्ते सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने सन्मानित व्यसनमुक्ती अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. सोमनाथ गिते यांचा व्यसनमुक्ती आणि सामाजिक जनजागृतीच्या कार्याबद्दल लोणी येथे शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्तेही त्यांचा नुकताच सन्मान करण्यात आला होता.

डॉ. गिते हे गेल्या अनेक वर्षांपासून व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात कार्यरत असून युवक, विद्यार्थी, पालक व नागरिकांमध्ये व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहेत. व्यसनमुक्तीविषयक व्याख्याने, जनजागृती अभियान, अभ्यासपूर्ण लेखन तसेच सामाजिक संस्थांच्या माध्यमातून त्यांचे कार्य सुरू आहे. व्यसनाधीन व्यक्ती व त्यांच्या कुटुंबीयांना मार्गदर्शन करण्याबरोबरच पुनर्वसन आणि सकारात्मक जीवनशैलीबाबतही ते मार्गदर्शन करतात.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे त्यांना 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे. सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल त्यांना डॉक्टरेट पदवीनेही सन्मानित करण्यात आले आहे.

यावेळी शालिनीताई विखे पाटील यांनी डॉ. गिते यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा सन्मान प्रेरणादायी असून व्यसनमुक्त समाजासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाल्याचे डॉ. गिते यांनी सांगितले.



# जन्माचा दाखला रखडल्याने आधार कार्ड होईना शाळांची संच मान्यता आधार अभावी अडचणीत !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** जन्मतारखेच्या दाखल्याची पडताळणी प्रक्रियेला विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांचे आधार कार्ड तयार करण्यात अडचणी येत आहेत. आधार कार्डअभावी विद्यार्थ्यांची संचमान्यतेत गणना होत नसल्याने यंदा शाळांच्या पटसंख्येवर तसेच शिक्षक संचमान्यतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पूर्वी मुख्याध्यापकांच्या बोनाफाईड दाखल्याच्या आधारे विद्यार्थ्यांचे आधार कार्ड तयार होत होते. मात्र, गेल्या वर्षापासून जन्मतारखेचा क्यूआर कोड असलेला दाखला आवश्यक करण्यात आला आहे. नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीकडून मिळणारा दाखला पडताळणीसाठी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठविला जातो. जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात दाखले पडताळणीसाठी येत असल्याने प्रक्रियेला दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागत असल्याचे सांगण्यात येते.

३० सप्टेंबरला शाळांची संचमान्यता होणार असून, त्यापूर्वी विद्यार्थ्यांचे आधार तयार होणे आवश्यक आहे. लोणी ग्रामपंचायतीकडे जन्मनोंदीशी संबंधित मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्याची माहिती आहे. त्यामुळे पडताळणीचे अधिकार स्थानिक पातळीवरील सक्षम अधिकाऱ्यांना देऊन प्रक्रिया जलद करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे. तसेच पूर्वीप्रमाणे आधारसाठी मुख्याध्यापकांचा बोनाफाईड दाखला ग्राह्य धरावा, अशी मागणी शिक्षकांनी केली आहे.

**'शाळेसाठी आवश्यक दाखले तातडीने मिळण्यासाठी यंत्रणा कार्यरत'**

शासनाच्या नियमानुसार जन्मतारखेचे दाखले पडताळणीसाठी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठविले जातात. जिल्हाभरातून दाखले येत असल्याने विलंब होतो. मात्र, शाळांसाठी आवश्यक दाखले तातडीने मिळावेत यासाठी यंत्रणा कार्यरत आहे, असे नगरपरिषद आरोग्य विभागाचे अरुण लांडे यांनी सांगितले.

**'प्रश्न तातडीने मार्गी लावावा'**

जन्मतारखेचा दाखला वेळेवर मिळत नसल्याने आधार तयार होत नाही आणि अशा विद्यार्थ्यांची संचमान्यतेत गणना होत नाही. शासनाने तातडीने निर्णय घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी शिक्षक नानासाहेब बडाख यांनी केली.




# भागवत साळुंके बजाजच्या प्रतिष्ठित एक्झिक्युटिव्ह क्लब पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील भानसहिवरा गावचे सुपुत्र इंजिनिअर भागवत देविदास साळुंके यांना नुकताच बजाज कंपनीच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित एक्झिक्युटिव्ह क्लब पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पन्नास हजार रुपये रोख व सन्मानपत्र बजाज पिन असे पुरस्काराचे स्वरूप असून कंपनीचे व्हाईस चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर राजीव जैन यांच्या हस्ते पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




बजाज कंपनीच्या एफ वाय २६ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल कंपनीतील निवडक ५६० कर्मचाऱ्यांमध्ये स्थान मिळवत भागवत साळुंके यांनी प्रतिष्ठित एक्झिक्युटिव्ह क्लब पुरस्कार जिंकला आहे.भागवत साळुंके यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दिलेले समर्पण आणि उत्कृष्ट योगदानाची दखल घेत हा पुरस्कार मिळाला आहे.

इंजिनियर भागवत साळुंके हे भाजप ओबीसी मोर्चाचे राज्य नेते व नेवासा येथील आडत व्यापारी देविदास सदाशिव साळुंके यांचे चिरंजीव आहे. पुरस्काराबद्दल भागवत साळुंके यांचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनखुळे, आ. विठ्ठलराव लंघे, माजी आ. संभाजी फाटके, पांडुरंग अभंग, उदयन गडाख, जेष्ठ व्यापारी अशोकराव बोरा, मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील,किशोर जोजार, दिलीप पवार, पुरुषोत्तम सर्जे, अंकुश काळे, जनार्धन पटारे, प्रसाद पटारे, सोमनाथ शेंडे, अशोक कदम, बाळासाहेब भणगे, बाबासाहेब भणगे, तुकाराम भणगे यांनी अभिनंदन केले आहे.

# ऊस गाळप हंगामपूर्व बैठक तातडीने घ्या ; अभिजीत पोटे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** सन २०२६-२७ च्या ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मागील हंगामातील त्रुटी, ऊस दरातील अनियमितता व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली हंगामपूर्व बैठक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजीत अशोकराव पोटे यांनी केली. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले. पुढील आठवड्यात बैठक घेण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याचे पोटे यांनी सांगितले.

सन २०२३ मध्ये कुंडलिकराव जगताप सहकारी साखर कारखान्याने जास्तीचा ऊस दर सांगून ऊस नेल्यानंतर केवळ एफआरपीप्रमाणे पैसे दिल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ७११ रुपयांचा तोटा सहन करावा लागल्याचा आरोप पोटे यांनी केला. संबंधित कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांना बैठकीस बोलावून निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

सन २०२५-२६ मध्ये काही कारखान्यांनी साखर उतारा कमी दाखवून दर कमी दिल्याचा आरोपही त्यांनी केला. वाहतूक खर्च, साखर उताऱ्यातील तांत्रिक त्रुटी यावरही चर्चा करण्याची मागणी करण्यात आली.




कमी पर्जन्यमानामुळे यंदा उसाची अपेक्षित वाढ झालेली नसल्याने गाळप ऑक्टोबरऐवजी नोव्हेंबरअखेर किंवा डिसेंबरमध्ये सुरू करावे, अशी मागणी पोटे यांनी केली. शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसू नये म्हणून किमान प्रतिटन एक हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

# शिवीगाळ केल्याने गाडी अडवून दोघांना मारहाण, दोघांविरुद्ध गुन्हा


**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** रात्री शिवीगाळ केल्याच्या कारणावरून पिकअप गाडी अडवून दोघांना शिवीगाळ व दमदाटी करत उसाने मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राहुरी-शनी शिंगणापूर रोडवरील साई रसवंतीजवळ घडली. सोहेल अनवर शेख (वय २५, रा. राहुरी खुर्द) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार, १४ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास शुक्लेश्वर चौकात असताना त्यांना विनाकारण शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सोहेल शेख व त्यांचा चुलत भाऊ अफताप शेख हे पिकअपमधून कोंबड्या घेऊन राहुरीकडे येत होते. त्यावेळी साई रसवंतीजवळ आरोपी इरफान नासिर पठाण व सोहेब आसिफ पठाण (दोघे रा. गौटुंबे आखाडा) यांनी गाडी अडवून 'रात्री शिवीगाळ का केली?' असे म्हणत दोघांना उसाने मारहाण केली. तसेच कोयत्याने मारून टाकण्याची धमकी दिली.याप्रकरणी गुन्हा रजि. नं. १०५४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ३५१ (२), ३५२ व ३ (५) नुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख करीत आहेत.

# आयुर्विमा व आरोग्य विमा संरक्षणाचे कवच प्रत्येकाने घ्यावे : राऊत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये आयुर्विमा व आरोग्य विमा अत्यंत महत्त्वाचा झाला असून प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील सदस्यांचा आयुर्विमा व आरोग्य विमा घेणे काळाची गरज झाली असल्याचे प्रतिपादन विमा प्रतिनिधी अर्जुन राऊत यांनी केले. सी डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स श्रीरामपूर येथे आयुर्विमा व आरोग्य विमा याचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी राऊत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अहिल्यानगर केअर हेल्थ कंपनीचे ब्रांच हेड अनिल थोरात, सीनियर मॅनेजर राम कडूस, उपस्थित होते. यावेळी राऊत म्हणाले की कुटुंबातील प्रमुख व्यक्ती दगावल्यानंतर ते कुटुंब निर्धार होते. त्याला आपल्या गरजा भागविण्यासाठी शाश्वत रक्कम मिळत राहावी व कुटुंबातील सदस्यांचे जीवनमान व आरोग्य मान अबाधित राहावे यासाठी विमा पॉलिसी घेणे महत्त्वाचे झाले असल्याचे त्यांनी सांगितले. सध्याचे जीवनमान धोक्याचे झाले असून रासायनिक खतांमुळे दूषित अन्न सेवन केल्यामुळे विविध आजार बळावत आहेत. त्याचप्रमाणे हवेमध्ये कार्बन डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढल्याने दूषित हवा, विविध प्रदूषित सांडपाण्यामुळे जल प्रदूषण त्याला ही मानव जातीला सामोरे जावे लागत आहे. त्यातून माणसाची रोगप्रतिकारशक्ती कमी झाली असून आयुष्यमान ही कमी झाले आहे. त्यामुळे कॅन्सर, अचानक अटॅक येणे, श्वसनाचे आजार असे विविध आजार अचानक उद्भवत आहेत. त्याचप्रमाणे मानवी जीवनाचे मूल्य ओळखून आपण त्याप्रमाणे जीवन विमा पॉलिसी घ्यावी व आरोग्य सेवेच्या खर्चासाठी आरोग्य विमा घ्यावा असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी आरोग्य विमा बद्दल केअर हेल्थ चे अनिल थोरात व राम कडूस यांनी ही माहिती दिली.




कार्यक्रमाचे संयोजन डॉ. जी. सी. पुंड, डॉ. एम. ए. घोलप, प्रा. डी. पी. तांबडे अर्थशास्त्र विभाग यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रो. डॉ. संतोष घंगाळे यांनी केले. आभार प्रा. पुंड यांनी मानले.

# शिवपाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांचा शेतकऱ्यांनी मांडला पाढा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले :** शिवपाणंद शेतरस्त्यांच्या विविध समस्यांबाबत अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांनी राज्य कमिटीचे समन्वयक शरदराव पवळे यांच्यासमोर अडचणींचा पाढा मांडला. तहसील कार्यालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकालात काढण्यासाठी शासनाकडे आग्रह धरण्यात येईल, असे पवळे यांनी सांगितले. शासकीय विश्रामगृह, अकोले येथे झालेल्या बैठकीत पवळे यांनी शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. शिवपाणंद शेतरस्त्यांबाबत राज्यातील विविध भागांत अनेक प्रश्न प्रलंबित असून, ते मार्गी लावण्यासाठी राज्य शासन व राज्य कमिटीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी तालुक्यात मोठी चळवळ उभारण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.



'शेत तेथे रस्ता, गाव तेथे समृद्धी' या न्यायाने शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. शेतकरी सरकारच्या विरोधात नसून त्यांच्या हिताचे निर्णय घेणे आवश्यक आहे. शेतकरी समृद्ध झाला तर महाराष्ट्रही समृद्ध होईल, असा विश्वास पवळे यांनी व्यक्त केला. शेतकरी व अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. पवळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा देण्याची तयारी दर्शविली. बैठकीस प्रा. सहदेव चौधरी, रमेशराव राक्षे, जालिंदर बोडके, डॉ. सचिन दातीर, भाऊसाहेब आंबरे, ज्ञानेश्वर जगधने, बाळासाहेब भांगरे, बाळासाहेब कोटकर, अशोक रावते, माधुरी वैद्य, सुरेखा शिंदे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# संगमनेरचा ३३ हजार ७९२ हेक्टर खरीप क्षेत्र बाधित

## पावसाच्या खंडामुळे पिके धोक्यात; आ. खताळांची मुख्यमंत्र्यांकडे तातडीच्या मदतीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर : संगमनेर तालुक्यातील तब्बल ३३ हजार ७९२.५ हेक्टर म्हणजेच ४०.३५ टक्के खरीप क्षेत्र पावसाच्या खंडामुळे बाधित झाले आहे. पिकांना सध्या पाण्याची गरज असताना पावसाने ओढ दिल्याने अनेक भागांतील पिके कोमेजली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.**



या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

तालुक्यातील चार कृषी मंडलांत यंदा एकूण ८३ हजार ७४१ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. त्यापैकी ३३ हजार ७९२.५ हेक्टर क्षेत्र बाधित असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. कोकणगाव मंडलात सर्वाधिक १६ हजार २०० हेक्टर, साकूर मंडलात १० हजार ३४६ हेक्टर, घारगाव मंडलात ६ हजार १११.५ हेक्टर, तर संगमनेर मंडलात १ हजार १३५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

मका, सोयाबीन, बाजरी तसेच विविध कडधान्यांच्या पिकांवर पावसाच्या अनिश्चिततेचा परिणाम झाला आहे. सुरुवातीला झालेल्या पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली; मात्र त्यानंतर पडलेल्या दीर्घ खंडामुळे वाढ खुंटली आहे.

या परिस्थितीची दखल घेत आ. खताळ यांनी मुंबईत मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. कृषी विभागाचे संयुक्त पथक नियुक्त करून प्रत्यक्ष पीक पाहणी व पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत, आवश्यक सवलती व नुकसानभरपाईच्या योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# द • ख • ल

## सुजाता इंटरनॅशनल स्कूलचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

**सोनई :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित तालुकास्तरी बुद्धिबळ स्पर्धा वार शुक्रवार दि. ११ सप्टेंबर रोजी यश अकॅडमी सोनई या ठिकाणी पार पडल्या तालुक्या मधून एकूण ०९ शाळांनी सहभाग घेतला होता. यामध्ये आपल्या सुजाता इंटरनॅशनल स्कूल ची विद्यार्थिनी १७ वर्ष मुली या वयोगटात श्रावणी सुनील झिने हिने प्रथम क्रमांक मिळविला तिची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे. त्याचबरोबर १४ वर्ष मुली या वयोगटात अक्षरा शिंदे (द्वितीय क्रमांक), १४ वर्ष मुले या वयोगटात पुष्कर ओटी (द्वितीय क्रमांक) व १९ वर्ष मुले वयोगटात सार्थक दहिफळे (तृतीय क्रमांक) याप्रमाणे यश संपादन केले. यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरणजी सोनवणे, प्राचार्या ज्योती सोनवणे व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## आकार पीडित शेतकऱ्यांच्या लढ्याला यश ॲड. अजित काळे यांचा सत्कार



**टाकळीभान :** गेल्या अनेक वर्षापासून आकार पडीत शेतकऱ्यांचा प्रश्न आंदोलन करत व न्यायालयीन मार्गाने लढून ड अजित काळे यांनी हा लढा यशस्वी केल्याबद्दल, व राज्य मंत्रिमंडळाने आकारपडीत शेतकऱ्यांना जमीन वाटपाबाबत मंजुरी दिल्याबद्दल टाकळीभान येथील शेतकऱ्यांच्या वतीने ड अजित काळे यांचा फटाके वाजून जल्लोषात सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, पोपटराव जाधव,रामदास नाईक, श्रीकृष्ण वेताळ, रणजीत मगर,अनिल बोडखे, सुजित बोडखे, देविदास नाईक,पांडुरंग मगर,विलास बोडखे, दिगंबर मगर, नितीन वेताळ,सुरेश पटारे, अरविंद साळवे आदी उपस्थित होते.

## कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियंता दिन उत्साहात




**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात अभियंता दिन व दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे व कामाचे योग्य व्यवस्थापन केल्यास जीवनात यशस्वी होता येते, असे सांगितले. कार्यक्रमास अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डांगे म्हणाले, अभियंत्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा. विद्यार्थ्यांनी निश्चित ध्येयाशी प्रामाणिक राहून कठोर परिश्रम करावेत. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना वेळेचे योग्य नियोजन करून निर्णय घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी डॉ. सचिनकुमार नांदगुडे, डॉ. कैलास कांबळे, डॉ. व्ही. पी. पाटील उपस्थित होते. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थी तथागत याने विश्वेश्वरय्या यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. कैलास कांबळे यांनी केले. डॉ. डी. डी. पारधे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी केले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणरायाच्या मूर्तीवर शनिदेवाची प्रतिमा



**सोनई :** गणेश उत्सव हा केवळ उत्सव न राहता एक सामाजिक बांधिलकी व हिंदू संस्कृती परंपरा जपण्याचा संदेश देणारा ठरावा, यां उद्देशाने शनिशिंगनापूर येथे पर्यावरण मुक्त अनोख्या पद्धतीने श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.शनेश्वर देवस्थानाचे पहिल्या महिला विश्वस्थ शालिनीताई लांडे व सामाजिक कार्यकर्ते राजूभाऊ लांडे यांनी शनिशिंगनापूर निवासस्थानी गणरायाची विधिवत पूजा करून प्राणप्रतिष्ठा केली.विशेष म्हणजे गणेशमूर्तीवर शनिदेवाची प्रतिमा रेखाटण्यात आली आहे. गणरायाचे हे अनोखे रूप भाविकाचे लक्ष वेधून घेत आहे.दोन दिवसापासून गणेश भक्त दर्शनासाठी येत असून भाविकाचे लक्ष वेधून घेत आहे.

## राहाता-पानोडी रस्त्याच्या कामाची चौकशी करा : भाऊ प्रतिष्ठानचा उपोषणाचा इशारा

**आश्वी :** शिर्डी-पुणे राज्य मार्ग क्रमांक ६७ वरील राहाता ते पानोडी घाटपायथा या सुमारे ३६ किलोमीटर रस्त्याचे काम सुरू असून, शिबलापूर ते आश्वी खुर्द या टप्प्यातील कामाच्या दर्जाबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. भाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास गायकवाड व सचिव सतीश गायकवाड यांनी कामाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. या टप्प्यात काही ठिकाणी मुरुमाऐवजी माती किंवा अन्य कच्चा माल वापरला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच कच्च्या मालावर योग्य प्रमाणात पाणी न मारताच सिमेंट काँक्रिटीकरण सुरू केल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेची तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली. आश्वी खुर्द येथे रस्त्यासोबत सुरू केलेल्या भूमिगत गटारीचे काम अनेक ठिकाणी अर्धवट राहिले असून काही ठिकाणी गटारी उंच-सखल झाल्याचा आरोप आहे. त्यामुळे व्यावसायिक, वाहनचालक व नागरिकांना अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. कामाचा खर्च सुमारे २०० कोटी रुपये असल्याचे सांगत कामाची गुणवत्ता, कच्चा माल, ठेकेदार व तांत्रिक निकष याबाबत पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने दखल न घेतल्यास उपोषण करण्याचा इशारा गायकवाड यांनी दिला. सुमारे २०० कोटी रुपयांच्या खर्चातून सुरू असलेल्या या रस्त्याचे काम नियमानुसार व दर्जेदार होत आहे का, याची स्वतंत्र चौकशी करावी. कामाचा खर्च व तांत्रिक निकषांची माहिती नागरिकांना द्यावी, अशी मागणी भाऊ प्रतिष्ठानने केली आहे.

# निळवंडे कालव्याच्या डीवाय-४ चारीवर व्हॉल्व्ह बसविण्यासाठी अंतिम पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील जिरायती गावांना निळवंडे कालव्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी रांजणगाव देशमुख येथील मंगलमूर्ती लॉन्सजवळ डीवाय-४ चारीच्या पाईपलाईनवर व्हॉल्व्ह बसविण्यात येणार आहे. त्यासाठी निळवंडे कालव्याच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. १६) जागेची अंतिम पाहणी केली, अशी माहिती अंजनापूरचे माजी सरपंच ज्ञानदेव गव्हाणे यांनी दिली.

आ. आशुतोष काळे यांनी जिरायती भागातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निळवंडे कालव्याचे कार्यकारी अधिकारी प्रदीप हापसे व कैलास ठाकरे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत व्हॉल्व्ह बसविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार ही पाहणी करण्यात आली.

व्हॉल्व्ह बसविल्यानंतर अंजनापूर व रांजणगाव देशमुख परिसरातील पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव व बंधारे निळवंडे कालव्यातून भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेतकरी व नागरिकांना मोठा लाभ होणार असल्याचे गव्हाणे यांनी सांगितले. उजनी उपसा जलसिंचन योजनेच्या टप्पा एकमधून धोंडेवाडी, जवळके, बहादराबाद व शहापूर येथील तलाव व बंधारे भरले जातात. आता त्यास निळवंडे कालव्याच्या पाण्याची जोड मिळणार आहे. यावेळी उपअभियंता आसिफ शेख, तुषार मंडलिक, संदिप थेटे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.



**उजनी योजनेमुळे जिरायती भागाला दिलासा**

मा. आमदार अशोकराव काळे यांनी २००४ ते २०१४ या काळात पदरमोड करून रांजणगाव देशमुख उजनी उपसा जलसिंचन योजना चालविली. मध्यंतरी योजना बंद पडली होती. आमदार आशुतोष काळे यांनी २०१९ पासून ती पुन्हा सुरू केली. आता डीवाय-४ चारीतूनही तलाव, बंधारे व गाव तलाव भरण्याची सुविधा उपलब्ध होत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले, असे संदिप थेटे यांनी सांगितले.

# सायली पाटील उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** अहिल्यानगर मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली राजेंद्र पाटील यांना महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाकडून दिल्या जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील व मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार हा सायली पाटील यांना प्रदान करण्यात आला

सायली पाटील या अहिल्यानगर मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी कालवा मुखाशी घनमापन पध्दतीने पाणी पुरवठा करून वहनव्यय नियंत्रण, सिंचन आणि बिगर सिंचन देयके, ऑनलाईन बिलिंग प्रणाली वापर करणे. सिंचन बिगर सिंचन पाणीपट्टी वसुली १०० टक्के पूर्ण,धरणांची नियमित तांत्रिक तपासणी, नोंदी व गेट्सची देखभाल दुरुस्ती, पूररेषा आखणी, पूर नियंत्रणासाठी उपाययोजना,कालवा सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक डीपीआर तयार करणे, दुरुस्तीबाबत नियोजन करणे. बिगर सिंचन देयक प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी, पाणीपट्टी भरण्यासाठी क्यूआर कोडचा उपयोग,शासकीय मालमतांचे रक्षण, शासकीय जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर जलसंपदा विभागाचे नांव लावणेबाबत कार्यवाही,वांबोरी उपसा सिंचन योजना नियोजन करणे, पाखरण कार्यक्रमांतर्गत कालवा स्वच्छता कामे करणे,पाणी वापर संस्थांचे सुयोग्य पाणी पुरवठा नियोजनासाठी नवीन गेट बसविणेचा विशेष कार्यक्रम, पाणी वापर संस्थांची सक्षमीकरणाची कार्यात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे.

यावेळी झालेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रम प्रसंगी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, सचिव प्रकल्प समन्वयक जयंत बोरकर, सचिव लाभक्षेत्र विकास प्रकाश मिसाळ, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश मोरे, कोकण खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक सुदर्शन पगार,सेवानिवृत्त सचिव संजय बेलसरे, अतुल कपोले, हनुमंत गुणाले यांच्यासह विभागाचे प्रमुख अधिकारी आणि अभियंते उपस्थित होते.

# सुरेगावकर खाजगी बाजार समितीत डाळींबाला उंच्चांकी ६९०० दर तर कांद्याला ४९०० दर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** डाळींबाची आवक घटलेली असतांना देखील कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथील सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या डाळींब मार्केटमध्ये बुधवार (दि.१६) रोजी ३८०० ते ४००० क्विंटल डाळींबाची आवक होवून सुलतानपूर येथील व्ही.डी.देशमुख या डाळिंब उत्पादक शेतकऱ्याला उंच्चांकी ६९०० रुपयांचा दर मिळाला आहे. तसेच एक नंबर कांद्याला ४९०० चा उंच्चांकी दर मिळाला असल्याची माहिती सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संस्थापक शशिकांत वाबळे यांनी दिली आहे. मागील तीन वर्षापासून सुरेगाव येथे सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती सुरु झाल्यापासून कांदा,सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक बचतीबरोबरच वेळेची देखील बचत झाली आहे. त्यामुळे अल्पावधीतच सुरेगावकर बाजार समितीला शेतकऱ्यांची प्रथम पसंती मिळत आहे. शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेवून मागील वर्षापासून आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या सहकार्यातून संस्थापक शशिकांत वाबळे यांनी डाळींब मार्केट देखील सुरु केल्यामुळे राज्यातून २५० ते ३०० किलोमीटर एवढ्या दूरच्या अंतरावरून डाळींब उत्पादक शेतकरी या मार्केटला डाळिंब विक्रीसाठी घेवून येत आहे. शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार समितीत मिळणाऱ्या सुविधा, सन्मानाची वागणूक, मालाला मिळणारा योग्य दर आणि डिजिटल आर्थिक व्यवहारामुळे व्यवहार अधिक सुलभ व पारदर्शक होत आहेत.

विशेष म्हणजे, राज्याच्या एका कोपऱ्यात असलेल्या सुरेगाव येथील डाळिंब मार्केटकडे दूरवरच्या शेतकऱ्यांचा ओढा निर्माण झाला आहे. डाळिंबाची आवक कमी असतानाही ३८०० ते ४००० क्विंटलची झालेली आवक ही शेतकऱ्यांचा सुरेगावकर बाजार समितीवर असलेला वाढता विश्वास अधोरेखित करणारी ठरली असल्याचे संस्थापक शशिकांत वाबळे यांनी म्हटले आहे.

बुधवारच्या बाजारात डाळिंबाला सरासरी ८० ते १३० रुपये किलो दर मिळत असताना नंबर एकच्या दर्जेदार मालाला ३४५ रुपये किलोचा उच्चांकी दर मिळाला. कांद्यालाही सरासरी ४० ते ४५ रुपये किलो दर असताना एक नंबर कांद्याला ४९०० रुपये क्विंटलचा उच्चांकी दर मिळाला. या विक्रमी दरामुळे डाळिंब व कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**'कष्टाने पिकवलेल्या डाळिंबाला मिळालेला दर दिलासा देणारा' : देशमुख**

शेतकऱ्याच्या शेतमालाचे दर कधी कोसळतील, हे सांगता येत नाही. निसर्गाची परीक्षा तर शेतकऱ्याला सातत्याने द्यावीच लागते. अशा परिस्थितीत मोठ्या कष्टाने पिकवलेल्या डाळिंबाला सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या डाळिंब मार्केटमध्ये ३४५ रुपये किलोचा उच्चांकी दर मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि समाधानाचा क्षण आहे. मिळालेला हा चांगला दर दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी निश्चितच बळ आणि दिलासा देणारा आहे.

# पुण्यस्मरणानिमित्त मोफत नेत्र व दंत तपासणी शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** येथील श्री संत गाडगे महाराज आश्रमशाळेत जगन्नाथ सूर्यवंशी यांच्या मातोश्री कै. तुळसाबाई विठ्ठल सूर्यवंशी यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या शिबिराचे उद्घाटन राहुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक सागर तनपुरे होते. नगरसेवक रविंद्र आहेर व अरिफ शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. पुणे अंधजन मंडळाचे एस. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर संचालित नेत्र तपासणी केंद्र, राहुरी, दिव्यांग शक्ती सेवा संस्था आणि राहुरी तालुका प्रहार दिव्यांग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर घेण्यात आले. प्रारंभी संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिरास सुरुवात झाली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची नेत्र तपासणी केली. तसेच राहुरी येथील राम डेंटल क्लिनिकच्या तज्ज्ञांनी दंत तपासणी केली. मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांना पुढील शस्त्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे, तालुकाध्यक्ष योगेश लबडे, जिल्हा सल्लागार सलीम शेख, शहराध्यक्ष जुबेर मूसानी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक मधुकर घाडगे यांनी केले. नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. जगन्नाथ सूर्यवंशी यांनी उपस्थित मान्यवर, डॉक्टर, संघटनेचे पदाधिकारी, रुग्ण, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# संगमनेर साखर कारखाना कारभाराची चौकशी व्हावी

## संतोष रोहम यांची सहकार मंत्री व आयुक्तांकडे मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर :** साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर सभासदांच्या विविध प्रश्नांवरून शेतकरी नेते संतोष रोहम यांनी कारखाना प्रशासनाच्या कारभारावर गंभीर आरोप केले आहेत. सभासदांनी वार्षिक सभेत कोणते प्रश्न विचारायचे, याची माहिती पाच दिवस अगोदर द्यावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, सभेच्या केवळ दोन दिवस आधी सभासदांना अहवाल प्राप्त झाला. त्यामुळे प्रशासनाला सभासदांचे प्रश्न ऐकून घ्यायचे आहेत की केवळ अहवाल मंजूर करून घ्यायचा आहे, असा सवाल रोहम यांनी उपस्थित केला.

येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी (दि. १६) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी दीपक वाळे, रमेश शिंगोटे, विठ्ठल घोरपडे, नामदेव गुंजाळ, राजेंद्र सोनवणे, गुलाब भोसले, गोपीनाथ रुपवते, शंकर वाळे यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रोहम म्हणाले, मागील वर्षी पत्रकारांच्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर ऊस उत्पादकांना ३० किलो साखर देण्यात आली. यावर्षी प्रत्येक सभासदाला ५० किलो साखर देण्यात यावी. तसेच राजकीय कारणांमुळे सभासद होऊ न शकलेल्या ऊस उत्पादकांनाही ३० किलो साखर देण्यात यावी. कारखाना प्रशासनाने विविध कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला असून, सुमारे २० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. त्यातील दोन कोटी रुपये केवळ स्वच्छतागृहांसाठी खर्च केल्याचा दावा त्यांनी केला.

सभासदांच्या पैशातून इमारती उभारल्या जात असतील आणि त्यांचा सभासदांना प्रत्यक्ष फायदा होत नसेल, तर अशा इमारती कशासाठी उभारल्या जात आहेत, असा प्रश्नही रोहम यांनी उपस्थित केला. कारखान्याच्या कारभाराबाबत लवकरच मुख्यमंत्री, सहकार मंत्री आणि सहकार आयुक्तांची भेट घेऊन चौकशीची मागणी करण्यात येणार आहे. आवश्यकता भासल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब करून कायदेशीर लढाई लढण्याचा इशाराही त्यांनी दिला.

कारखान्याने सभासदांच्या वारसांची नोंद करावी, अशी मागणी करताना दीड लाख पोती साखरेचा हिशेब मिळत नसल्याचा आरोप रोहम यांनी केला. हा गंभीर प्रकार असून सभासदांची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी म्हटले.

संगमनेर सहकारी दूध उत्पादक संघाच्या वार्षिक सभेत दूध उत्पादकांचा रिबीट व अनामत जाहीर करावी, तसेच साखर कारखान्याने राज्यातील ऊस उत्पादकांना सर्वोच्च दर देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणीही त्यांनी केली. नुसत्या इमारती बांधल्याने संस्था मोठी होत नाही. निवडणुका आल्या की संस्था क्रमांक एक असल्याचे सांगितले जाते; मात्र सहकारी संस्था कोणाच्या वैयक्तिक मालकीच्या नसून सामान्य सभासदांच्या मालकीच्या आहेत. संगमनेर साखर कारखाना सहकारी राहिलेला नसून खासगी कंपनीप्रमाणे चालविला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

भोजापूर चारीचा पाणीप्रश्न गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित आहे. तसेच साकूर-पठार भागाचा पाणीप्रश्न सोडविण्याचा ध्यास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांनी घेतला आहे. त्यामुळे आगामी काळात या भागात पाणी पोहोचविण्यासोबतच एमआयडीसी उभारणीचा प्रश्नही मार्गी लागेल, असा विश्वास रोहम यांनी व्यक्त केला.

**साखर उत्पादनाच्या आकडेवारीवर रोहम यांचा आक्षेप**

चालू गळीत हंगामात ७ लाख ६५ हजार २६१ मेट्रिक टन उसाचे गाळप झाले असून साखरेचा उतारा ११.४२ टक्के राहिला. या उताऱ्यानुसार सुमारे ८ लाख ७३ हजार ९२८ क्विंटल साखर तयार होणे अपेक्षित होते, असा दावा संतोष रोहम यांनी केला. मात्र, कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालात ७ लाख २४ हजार क्विंटल साखर उत्पादनाची नोंद असल्याचे त्यांनी सांगितले. अपेक्षित उत्पादन आणि अहवालातील नोंद यामध्ये सुमारे १ लाख ४९ हजार ९२८ क्विंटलची तफावत असल्याचा दावा त्यांनी केला. चालू बाजारभावानुसार या तफावतीची किंमत सुमारे ७५ कोटी रुपये होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी रोहम यांनी केली.

# पान १ वरुन

## मराठा आरक्षण : शिंदे समितीचा दरमहा निधी बंद

येणाऱ्या बैठकीसाठी ५० हजार रुपये, विभागीय आयुक्त स्तरावरील बैठकीसाठी दोन लाख रुपये मानधन निश्चित करण्यात आले आहे. अशा बैठकींचे एकत्रित मासिक मानधन चार लाख रुपयांच्या मर्यादेत राहणार असल्याचे या निर्णयात नमूद करण्यात आले आहे. या तरतुदीनंतर लगेचच जारी करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकामुळे मानधनाच्या स्वरूपात महत्त्वाचा बदल झाला आहे. २५ जूनच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक चारमध्ये न्या. संदीप शिंदे यांना समितीच्या कामकाजासाठी दरमहा चार लाख रुपये मानधन अनुज्ञेय राहील, अशी तरतूद होती. १६ सप्टेंबरच्या शुद्धीपत्रकाने ही तरतूद थेट वगळण्यात आली आहे. त्यामुळे निश्चित मासिक चार लाख रुपयांच्या मानधनाऐवजी बैठकींच्या स्वरूपानुसार देयकाची व्यवस्था लागू राहणार आहे.

## मुंबईतील नियोजित आंदोलन मागे घ्या; विखे- पाटील यांचे जरांगेंना आवाहन

बुधवारी सांगितले. पाटोदा येथे पोहोचल्यानंतर त्यांनी जनसमुदायाला संबोधित केले. आपल्याला पोटात आणि पायात तीव्र जळजळ होत आहे. मी उपचार घेतले तर सरकार पूर्णपणे निर्धास्त होते.
जर मी उपचार थांबवले, तर ते तणावाखाली येतात. मुंबईचा हा दौरा माझ्या आरोग्यावर ताण आणत आहे. प्रकृती ठीक असेल तर मी पुढे जाऊ शकतो, पण उपोषण सुरू असताना इतका मोठा प्रवास करणे योग्य नाही.
काहीच पर्याय उरला नाही, तर दौरा रद्दही होऊ शकतो. दौऱ्यापेक्षा आरक्षण अधिक महत्त्वाचे आहे; मात्र पोटात आणि पायात होत असलेल्या जळजळीमुळे हा दौरा करणे अशक्य वाटत आहे, असे जरांगे म्हणाले.

## दुष्काळात वीजेचा तेरावा महिना!

बाहेर काढून सबस्टेशनला कुलूप ठोकले.आंदोलन सुरू झाल्यानंतर काही वेळात नेवासा येथून वीजपुरवठा सुरू करण्यात आल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. ओव्हरलोडमुळे भोकर सबस्टेशनचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याचे कारण महावितरणकडून सांगण्यात आले. मात्र, श्रीरामपूर तालुक्यातील वीजपुरवठा वारंवार खंडित करून नेवासा भागातील वीजपुरवठा सुरळीत ठेवला जात असल्याची माहिती मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

पाऊस नाही, हाताशी असलेले पाणी विजेअभावी पिकांना देता येत नाही आणि वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे. शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा मिळावा, वीजपुरवठा खंडित होण्याचे कारण स्पष्ट करावे आणि शेती वाहिनीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.आंदोलनात सरपंच सागर मुठे, शिवाजी पवार, अक्षय चौधरी, बबन लहानु मुठे, नवनाथ मुठे, अशोक चौधरी, दिलीप मुठे, नितीन मुठे, युवराज गायकवाड, नितीन रामदास मुठे, महेश चौधरी, प्रशांत शिनगारे, वैभव मुठे, विठ्ठल जासूद, सचिन जासूद, श्रीकृष्ण मुठे, गणेश मुठे, किरण संजय मुठे, सुरज मुठे, गौरव लंबे, डॉ. गणेश मुठे, गोपाळ मुठे, गिरीश मुठे, बाळू पाचपिंड, रुद्र पाचपिंड, वैभव गोसावी, महेश मारुती मुठे, अजित गोसावी, प्रणव गोसावी आदी शेतकरी सहभागी झाले.

# आ. बंब यांच्यावरील बेताल वक्तव्य विरोधात कारवाई करावी

## भाजप पदाधिकाऱ्यांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** पंचायत समिती कार्यालयासमोर शिक्षकांच्या आंदोलन दरम्यान आमदार प्रशांत बंब यांच्याविरोधात अक्षेपार्ह व बेताल वक्तव्य केल्याप्रकरणी पद्मकर इंगळे यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी अशी भारतीय जनता पार्टीच्या गंगापूर तालुका कार्यकारिणीच्या वतीने निवेदनात करण्यात आली असून जाहीर निषेध नोंदविण्यात आला आहे.
गंगापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की १५ सप्टेंबर २०२६ रोजी गंगापूर पंचायत समितीसमोर शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी 'धरणे आंदोलन' आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनादरम्यान अनेक वक्त्यांनी आपले विचार मांडले. मात्र, याच दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील पद्मकर इंगळे यांनी मूळ विषय सोडून आमदार प्रशांतजी बंब



यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.
या बेताल वक्तव्यामुळे संतप्त झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या गंगापूर तालुका कार्यकारिणीने या प्रकरणाचा तीव्र निषेध केला आहे. याप्रकरणी संबंधितांचे कॉल डिटेल्स, सीडीआर आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वरे करण्यात आली आहे .यावेळी प्रदीप भैय्या पाटील, दीपक साळवे, रवींद्र चव्हाण,भाग्येश गंगवाल, विजय पानकडे, राकेश कळसकर, मारुती खैरे,मधुकर वालतुरे,आनंद पाटील,जाफर शेख वसंत खताळ,अरुण लांडे,अत्तर जोहरी, राजेंद्र राठोड, कृष्णकांत व्यवहारे, अतुल रासकर, अरुण सागर, भारत पाटील,राहुल सटाले, भिकचंद कोठुळे, भागिनाथ साळुंखे,संदीप बोजवारे,ज्ञानेश्वर पवार, सतीश बारे, रामेश्वर पाटील, तेजस सोनवणे,मोहसीन शेख, गणेश पाटील,सोमनाथ शिंदे,सलमान शेख,योगेश चव्हाण, ऋषिकेश जाधव,रफिक पठाण,संजय अभंग, मनोज गायकवाड आदीसह भाजपा लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभियंता दिनानिमित्त तांत्रिक प्रश्नमंजुषा स्पर्धा

### अजितदादा पवार पॉलिटेक्निकमध्ये आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक येथे अभियंता दिनानिमित्त विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानाला चालना देण्यासाठी तांत्रिक प्रश्नमंजुषा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तांत्रिक ज्ञान व बुद्धिमत्तेचे प्रदर्शन केले.

कार्यक्रमास महावितरणच्या बेलापूर विभागाचे उपविभागीय अभियंता चांदे साहेब व टाकळीभान येथील सहाय्यक अभियंता एस. पी. पाडसवान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. चांदे साहेब यांनी 'हरित ऊर्जा' विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सौर व पवन ऊर्जेसारख्या अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर, ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी हरित ऊर्जेबाबत समाजात जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत संगणक तंत्रज्ञान विभागाच्या श्रद्धा घुगे, डिके तेजल, मावस्कर साक्षी व लांबले भाग्यश्री यांनी प्रथम, तर यांत्रिकी विभागाच्या प्रमोद मतकर, रोहित तांबे, साहिल बत्ताशे व अनिकेत तांबे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. संचालक दिलीप पवार अध्यक्षस्थानी होते. प्राचार्या सौ. पूनम बोधक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.

# फेरफार उताऱ्यासाठी शेतकऱ्यांना तहसीलचे उंबरठे झीजवण्याची वेळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** सरकारी काम आणि वर्षभर थांब या म्हणी प्रमाणे गंगापूर तहसील कार्यालयातील अभीलेख कक्षात शेतकऱ्यांना एक फेरफार नक्कल काढण्यासाठी बारा ते पंधरा दिवस थांबून देखील फेरफार उतारा मिळत नसल्याने शेतकऱ्यांना तहसील कार्यालयातील अभीलेख कक्षात दररोज उंबरठे झीजवावे लागत आहे.

मात्र संबंधित विभागात अपूर्ण कर्मचारी संख्या असल्याने याचा त्रास शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे.शेतकऱ्यांना फेरफारचा उतारा त्वरित देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

शासनाकडून शेतकऱ्यांचे पिक कर्जमाफी करण्यात आली असून बँकांकडून परत कर्ज घेण्यासाठी सातबारा उतारा, फेरफार नक्कल द्यावी लागते.शेतकऱ्यांना फेरफार नक्कल काढण्यासाठी तहसील कार्यालयातील अभीलेख कक्षात अर्ज द्यावे लागते मात्र संबंधित शेतकऱ्यांनी तहसील



कार्यालयातील अभीलेख कक्षात अर्ज दाखल करुन बारा ते पंधरा दिवस उलटून ही फेरफार उतारा मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयातील अभीलेख विभागासमोर एकच गोंधळ केल्याचे पाहायला मिळत असुन दररोज शेतकऱ्यांना फेरफार उतारा काढण्यासाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झीजवून देखील नक्कल वेळेवर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना पिक कर्ज कधी मिळणार असा प्रश्न शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

गंगापूर तालुक्यात दोन महीण्यापासून पावसाने दडी मारल्याने आधीच शेतकरी मेटाकुटीला आला असताना दुसरीकडे शेतकऱ्यांना एका फेरफारच्या उताऱ्यासाठी दिवसभर अभीलेख विभागासमोर ताटकळत उभे राहावे लागत आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अभीलेख कक्षातील कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून शेतकऱ्यांना हव्या असलेल्या फेरफाचे उतारे व इतर कागदपत्रे त्वरित उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून करण्यात येत आहे.

## भागवत साळुंके यांचा प्रतिष्ठित एक्झिक्युटिव्ह क्लब पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** पुणे येथील बजाज फायनान्स कंपनीच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या निवडक ५६० अधिकाऱ्यांमध्ये स्थान मिळवत भागवत साळुंके यांनी प्रतिष्ठित 'एक्झिक्युटिव्ह क्लब' पुरस्कार प्राप्त केला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा कंपनीच्या वतीने सन्मान करण्यात आला. बजाज फायनान्समध्ये सुमारे ५० ते ६० हजार कर्मचारी कार्यरत असून, त्यामधून उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे निवड झालेल्या वरिष्ठ ५६० अधिकाऱ्यांमध्ये भागवत साळुंके यांचा समावेश झाला आहे. पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रुपये रोख रक्कम व सन्मानपत्र असे असून, बजाज फायनान्सचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.



भागवत साळुंके हे भानस हिवरे येथील रहिवासी असून, नेवासा बाजार समितीचे माजी अध्यक्ष देविदास साळुंके यांचे पुत्र आहेत. त्यांच्या या यशामध्ये वडील देविदासराव सदाशिवराव साळुंके व आई अलकाताई देविदासराव साळुंके यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच वरखेड येथील ज्येष्ठ ह.भ.प. धोंडीराम बापूजी सर्जे दादा यांचे ते नातू आहेत. भागवत साळुंके यांच्या या यशाबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर, आमदार विठ्ठलराव लंघे, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, माजी आमदार संभाजीराव फाटके, माजी आमदार चंद्रशेखर घुले, माजी आमदार पांडुरंग अभंग, युवा कार्यकर्ते ऋषिकेश शेटे, युवा नेते उदयन गडाख, जनार्दन पठारे, मुळा कारखान्याचे संचालक बाळासाहेब भणगे, नगराध्यक्ष डॉ. करण घुले, माजी जिल्हा परिषद सदस्य पुरुषोत्तम सर्जे, ऊस भूषण पुरस्कारप्राप्त दत्तात्रय सर्जे आदींसह अनेकांनी अभिनंदन करून कौतुक केले.

# पंचायत समिती व सर्व ग्रामपंचायत हद्दीतील गावात स्वच्छता मोहीम



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पि.एम.मिन्नू यांच्या आदेशानुसार जिल्हा भरातील पंचायत समिती व सर्व ग्रामपंचायत हद्दीतील गावात दर महिन्याच्या १ तारीख व १५ तारखेला स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून ही स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्यात येणार असल्याचे गट विकास अधिकारी सुहास वाकचौरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

गंगापूर तालुक्यातील नारायणपूर व वाळूज ग्रामपंचायत परिसरात तसेच जिल्हा परिषद शाळा येथे गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे व विस्तार अधिकारी अशोक घोडके,व ग्रामविकास अधिकारी स्वप्नील घरमोडे, उत्तम भोंडवे आदींनी स्वच्छता मोहीम राबवून परिसर झाडून कचरा गोळा करून पुर्णपणे जाळून टाकण्यात आले.

गंगापूर येथील पंचायत समिती येथे सहायक गटविकास अक्षय भालेकर यांनी व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी पंचायत समितीचा परिसर झाडून कचरा गोळा करून पुर्णपणे जाळण्यात येऊन स्वच्छता मोहीम राबविण्यात आली यापुढेही गंगापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या गावातील व पंचायत कार्यालयासह परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येऊन स्वच्छ ठेवण्यात येणार असल्याचे गट विकास अधिकारी सुहास वाकचौरे यांनी सांगितले.कक्ष अधिकारी अनिल रोकडे, सहाय्यक अशोक पाटेकर, कारभारी नेटके, सुजाता ठोंबरे, मजीद पठाण, किशोर गायकवाड, सुनीता माळी, विलास झाल्टे करण मोहिते दिपाली पुराणिक, कल्पना कोतकर ,प्रमोद देवरे, सुमीत नरोडे, सय्यद अली, अक्षय जाधव आदींनी या स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला होता.

## शिक्षणासोबत मैदानी खेळालाही विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे : राजेंद्र उंडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील शिवनेरी क्लबच्या मैदानावर अहमदनगर जिल्हा अमॅच्युअर शूटिंगबॉल असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय शूटिंगबॉल निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा शुभारंभ ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र उंडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना राजेंद्र उंडे म्हणाले, मोबाईलपेक्षा मैदानी खेळांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये ९ तर मुलींचे ५ संघ सहभागी झाले असून सुमारे २०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शिवनेरी क्लब, श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, महात्मा फुले विद्यालय दाढ, यशवंतराव चव्हाण विद्यालय राजुरी, डी. पॉल श्रीरामपूर, मुळा व्हॅली म्हैसगाव, बाळासाहेब वाणी इंग्लिश स्कूल तसेच ज्ञानवर्धिनी स्कूल आदी शाळांमधील खेळाडू सहभागी झाले. स्पर्धेसाठी पंच म्हणून बाळासाहेब जाधव व संदीप निबे यांनी काम पाहिले. निवड समितीमध्ये मुस्ताक



शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि आत्मविश्वास निर्माण होतो. खेळाच्या माध्यमातून गुण मिळविता येतात तसेच खेळाडूंसाठी नोकरीमध्येही आरक्षित जागा उपलब्ध असतात. त्यामुळे शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी खेळाकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.या निवड चाचणीमध्ये मुलांचे शेख, गणेश भांड व बाळासाहेब जाधव यांचा समावेश होता. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष मुस्ताक शेख, उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव, सचिव राजेंद्र पुजारी, गणेश भांड, सुनील गागरे, नितीन साबळे, संदीप निबे, सौरभ वरखडे, सुशांत आरंगळे आदी उपस्थित होते.

## बारागाव नांदूर १५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या सदस्यपदी राधेश्याम लहारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :**राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर सह इतर १५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी पिण्याची पाण्याची योजना मंजूर व्हावी म्हणून स्वर्गीय दगडू लहारे यांनी आटोकाट प्रयत्न केले होते आणि त्यांनी केलेल्या अपरिमित प्रयत्नांमुळे ही पाणीपुरवठा योजना मंजुर झाली होती.



आणि म्हणूनच त्यांच्या परिवारातील एक सदस्य हा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवरती कायमस्वरूपी सदस्य म्हणून असावा अशा पद्धतीची मागणी सर्वानुमते करण्यात येत होती. त्या अनुषंगाने या संदर्भात झालेल्या योजनेच्या बैठकीमध्ये या योजनेच्या अध्यक्षा सौ.विद्याताई शिवाजीराव गाडे व सर्व पाणीपुरवठा योजनेच्या सर्व सदस्यांनी एकमताने पाठिंबा दिला. व सर्वांच्य संमतीनेरा धेश्याम दगडू लहारे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्यांच्या सदस्य पदाच्या या निवडीबद्दल त्यांचा सर्व सदस्य व ग्रामस्थांनी सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी रविंद्र म्हसे, विराज धसाळ, राजूभाऊ शेटे, दत्तात्रय खुळे, साहेबराव म्हसे, अशोकराव कुलट, शिवाजीराव शेंडे, बापूसाहेब धसाळ, संजय तमनर, सुभाषराव पवार, श्री आढाव, मानोरी पाणीपुरवठा योजनेचे सचिव कोकाटे, ग्रामसेवक, आणि पाणीपुरवठा योजनेचे कर्मचारी शौकत इनामदार आदी उपस्थित होते.

## सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा अवतारदिन राहुरीत उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी समानतेची शिकवण दिली त्यांचे कार्य अलौकिक असे गौरवोद्गार तहसीलदार डॉ.अमित पवार काढले.राहुरी तहसील कार्यालयात महानुभाव पंथाचे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचा ८०६ वा प्रकट दिन शासकीय व निमशासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

महानुभव शिक्षण संस्थेचे बांबोरी येथील प्रमुख आचार्य ऋषिराज शास्त्री मामाजी यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी तहसील कार्यालयात तहसीलदार डॉ.अमित पवार यांच्या हस्ते सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामीं च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले याप्रसंगी बाबासाहेब लांबे, उद्योजक रवींद्र कोरडे, पिंपरी अवघड येथील सरपंच संदीप लांबे तेली समाजाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय सोनवणे, रितेश लांबे, राजेंद्र पानसंबळ, पप्पू महानुभाव, दीपक लांबे किशोर पेरणे आणि संदीप सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी रितेश लांबे यांनी सर्वज्ञ स्वामीची माहिती सांगितली तहसीलदार पवार यांचा सन्मान उपदेशी बांधवांच्या वतीने करण्यात आला यावेळी तहसील कार्यालयातील खामकर

भाऊसाहेब आदी मान्यवर उपस्थित होते तसेच आभार संदीप सोनवणे यांनी मांनले.



## निधन

### कचरू घोडके




**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील खडके - मडके येथील रहिवाशी कचरू उमाजी घोडके यांचे नुकतेच वयाच्या ६४ व्या वर्षी ऱ्हदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. खडके - मडके गावात ८ वर्षे कोतवाल म्हणून त्यांनी काम केले. ते शेवगाव तहसील कार्यालयात १० वर्ष शिपाई म्हणून सेवा केल्यानंतर ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्या अंत्यविधीसाठी ग्रामस्थ, नातेवाईक तसेच मित्रमंडळ मोठ्या संख्यने उपस्थितीत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले ३ सुना'व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### कुसुमबाई पाळंदे



**आंबी :** येथील जुन्या पिढीतील कुसुमबाई दगडू पाळंदे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या सोमनाथ, राजेंद्र पाळंदे व उषा पलघडमल यांच्या आई तर आंबी विविध सहकारी सोसायटीच्या संचालिका वैशाली पाळंदे यांच्या सासू होत.

### माधुरी मुठे



**माळवाडगांव :** मुठेवाडगांव येथील माधुरी अनिल मुठे ( वय २१) हिचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. माधुरी हिच्या आजारपणावर बऱ्याच दिवसांपासून रूग्णालयात उपचार सुरू होते. डॉक्टरांकडून उपचार सुरू असताना तब्येत अस्वस्थ झाल्याने यश आले नाही. माधुरी ही अनिल रमेश मुठे याची कन्या तर प्रगतशील शेतकरी रमेश व लहानु माणिक मुठे यांची नात होय.


### नाव चेंज करणे

माझे जुने नाव -Pathan Shaharuk Munir
बदलून आता
नवीन नाव - Pathan Shaharukh Munir असे आहे.
प्रामाणिक करण्यासाठी
आधार नंबर ९९६२४ २१९९ १४९

### नावात बदल

मी, अयाज फारूक शेख, राहणार नेवासा, याद्वरे जाहीर करतो की मी माझे नाव बदलून 'अयाज फारूक पिंजारी' असे केले आहे. यापुढे सर्व शासकीय, कायदेशीर, बँकिंग, शैक्षणिक, पासपोर्ट आणि इतर कामांसाठी माझी ओळख 'अयाज फारूक पिंजारी' याच नावाने केली जाईल.

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGE OLD NAME IN MY
AJMANA ABBAS SHAIKH
(BEFORE NAME)
TO NEW NAME AS
(AFTER MARRIGE)
AJMANA ISMAIL SHAIKH
(AADHAR NO. 3033 0069 5986)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE
NOTARY PUBLIC SHRIRAMPUR
PLACE- SHRIRAMPUR
DATE- 16/09/2026

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGE OLD NAME IN MY
ASPAK BADSHAHA SAYYAD
(BEFORE NAME)
TO NEW NAME AS
ASHPAK BADSHAH SAYYAD
(AADHAR NO. 2061 4238 1364)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE
NOTARY PUBLIC SONAI
PLACE - SONAI
DATE- 16/09/2026


## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 788 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 688 | 239 48 279 | 246 25 258 | 248 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 898 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 568 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 468 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 448 89 135 | 390 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 598 48 134 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 17/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 24/08/2026 | 240 6 | | | | |


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १४० २३० ७८० | ३ | १२० ६३० ५८० | ६ | १५० १६९ ६०० |

१५-५२-९३-३४-०६-६१

### कल्याण

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | १६० २५० ३४० | ६ | २८९ ३०७ ६०० | २ | १५६ १२९ २२८ |

५७-७१-३६-०४-३२-२५

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ० | १९० २८० २४४ | ४ | १३० ३३८ ४४६ | ७ | १२४ ७४९ ३०० |

१०-०५-६४-४८-९७-७३



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## द•ख•ल

### आता सर्वांनाच सिक्युरीटी गार्डची गरज : चांगदेव डोंगरे



**अहिल्यानगर :** माळीवाडा येथील भोपळे गल्लीमध्ये असणार्या शाम लॉजजवळ पार्थ सिक्युरीटि सर्व्हिसेसचे नुकतेच शानदार उद्घाटन झाले. त्यावेळी बोलतांना चांगदेव डोंगरे म्हणाले की, आता सर्वांनाच सिक्युरीटी गार्डची गरज दिसत असून यामुळे किरकोळ चोर्या तसेच आपल्या बिल्डींग, दुकान, घर आदींची काळजी घेतली जाते. ही सर्व सेवा अल्प किंमतीमध्ये आमच्याकडे उपलब्ध असल्याचे यावेळी त्यांनी आवर्जुन सांगितले. तसेच शाळा, खाजगी क्लासेस, कंपन्या, हॉस्पिटल आदी विविध ठिकाणी खाजगी सिक्युरीटी गार्डची २४ तास गरज असते. त्यासाठी अत्यंत विश्वासू कर्मचारी आमच्याकडे उपलब्ध असून ज्यांना गरज असेल त्यांनी कधीही आमच्याशी संपर्क करावा. तसेच ज्या - ज्या तरूणांना सिक्युरीटी गार्ड म्हणून काम करावयाचे असेल त्यांनीही संपर्क करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास नगरचे केंद्र संचालक शिवाजी व मोहिनी गिते,(मो.७२७६७२७८७४) जितेंद्र गांधी, तेजस डोंगरे, संभाजी जाधव, शाम कर्पे, जिव्वाप्पा बहिरवाडे, महेश बागले आदी उपस्थित होते. कार्यक्रमास माळीवाडा व परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच लवकरच या फर्मची एमआयडीसी शाखा सुरू करणार असल्याचे नगरचे संचालक शिवाजी अंबादास गिते यांनी सांगितले. तर कंपन्यांच्या कामा संदर्भात बाजीगर गाढवे हे ही एमआयडीसीमध्ये २४ तास उपलब्ध असणार असल्याचे यावेळी सांगितले.

### अविष्कार स्पर्धेमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो : प्रा. डॉ. झावरे



**टाकळी ढोकेश्वर :** अविष्कार स्पर्धेमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो असे प्रतिपादन न्यू आर्टस् महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.भास्करराव झावरे यांनी केले. टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या उद्घाटन समारंभानिमित्त 'अविष्कार प्रोजेक्ट्स प्रेझेंटेशन स्पर्धा -२०२६ आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजचे संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पा.होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. बी. एच. झावरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विज्ञान शिक्षण हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष प्रयोग,संशोधन आणि नाविन्यपूर्ण विचारांद्वारे समाजोपयोगी बनविण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयातील जिज्ञासा वाढवून संशोधनाची वृत्ती जोपासावी, तसेच आपल्या कल्पकतेचा उपयोग करून नवीन प्रकल्प सादर करावेत, असे त्यांनी सांगितले.'अविष्कार' सारख्या स्पर्धा विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढविण्यास उपयुक्त ठरतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच विज्ञानाच्या माध्यमातून समाजातील विविध समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विद्यार्थ्यांनी विकसित करावी असेही नमूद केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. एस. मतकर यांनी मनोगत व्यक्त केले. अविष्कार प्रोजेक्ट्स प्रेझेंटेशन स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कल्पना,संशोधनवृत्ती व नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. विज्ञानविषयक जिज्ञासा, सर्जनशीलता आणि प्रयोगशीलतेला चालना देणाऱ्या या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.जिजाभाऊ घुले यांनी केले.तर आभार प्रा.डॉ.व्ही.एम.गंगोत्री यांनी मानले.

### श्री.मुलिका देवी गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद

**निघोज :** येथील वराळ -ठुबे कुंड वस्ती परिसरातील श्री. मुलिका देवी गणेशोत्सव मंडळ हे ५० वे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत असून या गणेश मंडळाने प्रत्येक दिवशी कार्यक्रमांचे नियोजन केले असून गेली तीन दिवसात या कार्यक्रमांना परिसरातील भावीकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. यामध्ये चार दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, त्यानंतर महिलांचा मंगळागौरी कार्यक्रम, कु. निलमताई इचके यांचा होम मिनिस्टर कार्यक्रम, स्वररागिणी वर्षा एखंडे यांचा भक्तीगीत कार्यक्रम अशाप्रकारे दररोज कार्यक्रमांची मेजवानी असून सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत भावीकांची या ठिकाणी दर्शनासाठी गर्दी होत असते. सकाळ संध्याकाळ महाआरती, सत्यनारायण महापूजा या धार्मिक कार्यक्रमांना भावीक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंड वस्ती विकासासाठी या वराळ - ठुबे वस्तीने महत्वपूर्ण योगदान देत विविध शैक्षणिक कार्यक्रम असो वा शाळेचा विकास यासाठी सातत्याने आर्थिक सहकार्य करीत शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ दिले आहे. निघोज गाव व परिसरातील ग्रामअभियान ग्रामस्वच्छता कार्यक्रमास आवर्जून सहभागी होत सेवाभाव करण्याचे काम मंडळाचे पदाधिकारी व सदस्य नेहमीच करीत असतात. निघोज व पंचक्रोशीतील सेवाभावी गणेश मंडळ म्हणून या मंडळाचा लौकिक आहे.

## कुसुमताई काकडे यांचे निधन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**एरंडगाव :** शेवगाव येथील कुसुमताई विजयराव काकडे ( वय ७३ ) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच शेवगाव शहरासह तालुक्यात शोककळा पसरली असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला. कुसुमताई काकडे यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. ड. युवराज काकडे, ड. अभिजित काकडे तसेच डॉ. सुनिता आवारी यांच्या मातोश्री होत. शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. काकडे कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत उपस्थितांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कुसुमताई काकडे यांच्या निधनाने काकडे परिवारासह शेवगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पारनेर-नगरला दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्या : आ. दाते

## मुख्यमंत्री फडणवीसांकडे आग्रही मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** पारनेर व नगर तालुक्यात यंदा अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने दखल घेऊन दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी, पशुधन व सर्वसामान्य नागरिकांना तातडीने आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

आ. दातेंनी १५ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन पारनेर-

> महाराष्ट्रातील दुष्काळ मूल्यांकनात पर्जन्यमानाबरोबरच पिकांची स्थिती, मातीतील आर्द्रता, पेरणी क्षेत्र, भूजल व जलसाठ्यांची स्थिती यांसारख्या परिणाम निर्देशकांचा विचार केला जात असल्याचे स्पष्ट करत या पार्श्वभूमीवर पर्जन्यमान, पिकांची स्थिती, उपलब्ध जलसाठे, भूजल पातळी आणि शेतीवरील परिणाम यांचे तातडीने सर्वेक्षण व पंचनामे करून दोन्ही तालुक्यांना दुष्काळग्रस्त घोषित करावे.
>
> **आ. काशिनाथ दाते**

नगर विधानसभा मतदारसंघातील सद्यस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. कमी पर्जन्यमान आणि पावसातील खंडामुळे खरीप पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून पावसावर अवलंबून शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

दुष्काळ घोषित झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार पीक नुकसानभरपाई व दुष्काळी अनुदान, पीक कर्जवसुलीस स्थगिती व आवश्यक कर्जसवलत, शेतीपंपांना सुरळीत वीजपुरवठा,



जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणीही आ. दाते यांनी केली आहे. नैसर्गिक आपत्तीतील पीक नुकसानीसाठी पंचनाम्याच्या माध्यमातून मदत प्रक्रिया राबविली जाते, अशी शासनाची अधिकृत माहिती आहे.

तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा, आवश्यक जलस्रोत अधिग्रहण, उपलब्ध धरणे व जलसाठ्यांमधून पिण्याच्या पाण्यास प्राधान्य, तसेच रोजगाराची गरज असलेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराची कामे सुरू करण्याची मागणी त्यांनी केली आहे. जलसंधारण, पाझर तलाव, बंधारे, विहीर पुनर्भरण आणि गाळ काढण्याच्या कामांनाही प्राधान्य देण्याची मागणी आ. दाते यांनी केली आहे. पारनेर-नगरच्या शेतकऱ्यांवर संभाव्य दुष्काळाचे संकट अधिक गडद होण्यापूर्वी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात आणि शेतकरी व पशुधनाला दिलासा द्यावा, अशी भूमिका घेत आ. काशिनाथ दाते यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केल्याने या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले गेले आहे.

## लोहार महासंघाच्या कोषाध्यक्षपदी विजय म्हस्के



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :** लोहार महासंघाच्या कोषाध्यक्षपदी ढोरजळगांव येथील विजय आसाराम म्हस्के यांची निवड झाल्याबद्दल ढोरजळगाव परिसराच्या वतीने, वृद्धेश्वर उद्योगसमूहाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य बापूसाहेब पाटेकर हे होते. याप्रसंगी बोलताना पाटेकर म्हणाले की विजय म्हस्के यांच्या निवडीने सर्वसामान्य घटकाला न्याय मिळाला आहे. यावेळी म्हस्के यांचा फेटा बांधून ,शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी देविदास पाटेकर, बाळासाहेब कराड, महादेव पाटेकर, अनंता उकिरडे, गणेशकराड, राजेंद्र गिऱ्हे, देविदास सांगळे, शेषराव देशमुख, संभाजी फसले ,डॉ. प्रशांत बुधवंत, विकास देशमुख, कैलास देशमुख, बाळासाहेब कराड, वसंत गिऱ्हे मेजर,संदीप गिऱ्हे, संतोष अकोलकर, दिगंबर साबळे,अतुल लांडे, हसन शेख, गणेश जायभाये, ज्ञानेश्वर फसले आदींसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागवडे कारखान्याची १८ सप्टेंबरला वार्षिक सभा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ६१ वी अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, १८ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आली आहे. कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार असून सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन व्हा. चेअरमन सौ. मेघा औटी यांनी केले आहे. वार्षिक सभेची नोटीस तसेच अहवाल सभासदांना पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे सभासदांच्या दृष्टीने ही सभा महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, वार्षिक सभेच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे शनिवार, १९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता स्वर्गीय शिवाजीराव बापू नागवडे यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कारखाना व अंकुश पाटील तंत्रज्ञान, पलूस यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बापूंच्या स्मृतीस्थळी हा मेळावा होणार आहे.या मेळाव्यात ऊस व इतर पिकांचे व्यवस्थापन, कीड नियंत्रण, तसेच घरच्या घरी वॉटर सोल्युबल कृषी खते, कृषी संजीवके, कीटकनाशके व बुरशीनाशके तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादकांसह इतर शेतकऱ्यांसाठीही हा मेळावा मार्गदर्शक ठरणार आहे.स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांच्या ध्येयधोरणानुसार चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ सभासदांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे कारखाना प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सभासद शेतकऱ्यांच्या हिताला आतापर्यंत तडा जाऊ दिलेला नाही आणि भविष्यातही देणार नाही, अशी भूमिका संचालक मंडळाने व्यक्त केली आहे.

## स्व.मारुतराव घुले पाटील यांनी हरितक्रांती घडवून आणली : प्रा. शेरे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** कुठलीही व्यक्ती विशिष्ट ध्येय, उद्दिष्ट, हेतू व दृष्टिकोन घेऊन जन्माला येत नाही. हे सर्व कर्तुत्वाने घडते २०व्या शतकात राजकारण, समाजकारण, शिक्षण, उद्योग या क्षेत्रात जे ग्रामीण नेतृत्व उदयाला आले त्यामध्ये जिल्ह्याचे नेते, परिसराचे भाग्यविधाते स्व. मारुतरावजी घुले पाटील हे अग्रभागी होते. त्यांनी परीसरात हरितक्रांती घडवून आणली. लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी दीन, दलीत, पददलित, शेतकरी , कष्टकरी लोकांच्या जीवनात बदल घडवले. असे प्रतिपादन प्राचार्य सुरेश शेरे यांनी केले. यावेळी दत्तात्रय पवार म्हणाले उजाड माळरानी फुलवून बाग, फेडीन पांग दीन दुबळ्यांचे, रखरखत्या उन्हात उजाड माळराणी स्वप्न पाहण्याचे धाडस थोर पुरुषच करू शकतात आणि अशी स्वप्न उराशी बाळगून सत्यात उतरविण्याचे कार्य करणारेच खरे कर्मयोगी ठरतात. लोकनेते स्व मारुतरावजी घुले पाटील साहेब हे खऱ्या अर्थाने कर्मयोगी होते. सुनील करंडे, कल्याण जगदाळे, नवनाथ पवार, राजेंद्र शेळके, प्रदीप टाके यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयातील कु कोमल वडने, पल्लवी जमधडे व साक्षी वडने या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

# टाकळी-कडेवळीत रोज बिबट्याचे दर्शन

## कुत्रे, जनावरांवरील हल्ल्यांचे सत्र सुरूच

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**१११ :** श्रीगोंदा (प्रतिनिधी) : श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी-कडेवळीत, चांडगाव, शेडगाव आणि अधोरेवाडी परिसरात बिबट्याची दहशत दिवसेंदिवस वाढत आहे. उसाच्या फडात, मक्याच्या शेतात तसेच रस्त्यावर बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने शेतकरी अक्षरशः धास्तावले आहेत. त्यातच कुत्रे व पाळीव जनावरांवर हल्ल्यांच्या घटना सुरूच असल्याने शेतीकामे करायची तरी कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

दिवसा वीज उपलब्ध नसल्याने अनेक शेतकऱ्यांना रात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जावे लागते. मात्र अंधारात बिबट्या



### भय इथले संपत नाही!

कुठून येईल, याचा नेम नसल्याने शेतात जाणे म्हणजे जीव मुठीत घेऊन जाण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतातील कामे रखडल्याने पिकांचेही नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.एकीकडे दुष्काळाची झळ, दुसरीकडे बिबट्याची दहशत आणि तिसरीकडे पिके वाचविण्याची धडपड, अशा दुहेरी-तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. बिबट्याच्या भीतीने शेतकरी शेतात जाण्यास टाळाटाळ करीत असल्याने शेतीची दैनंदिन कामे खोळंबली आहेत.परिसरात बिबट्याचे सातत्याने दर्शन होत असतानाही त्याचा तातडीने बंदोबस्त होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. वनविभागाने तातडीने परिसराची पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

> रात्री शेतात जाणे जीवावर बेतू शकते!वीजपुरवठ्याच्या वेळेमुळे रात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना बाहेर पडावे लागते. मात्र बिबट्याच्या सततच्या दर्शनामुळे रात्रीची शेती धोकादायक बनली आहे. प्रशासनाने वीजपुरवठा, वनविभागाची गस्त आणि बिबट्याचा बंदोबस्त याबाबत समन्वयाने तातडीची कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.



अहिल्यानगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्स यांच्या वतीने त्रिपुंड-त्रिशूल-शक्ती तिलक अर्पण करण्यात आले. यावेळी बाबूशेठ बोरा, विनीत अजित बोरा, ईश्वर अशोक बोरा आदींसह देवस्थानचे अध्यक्ष अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, अशोकराव कानडे, महंत संगमनाथ महाराज पांडुरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसोंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा माणिकराव विधाते, संजय चाफे, नितीन पुंड **(फोटो : राजू खरपुडे ,नगर)**



कै. मारुतरावजी घुले पा. हे एक स्वयंप्रकाशित नेते होते- इंगावले सर सुरेश पाटील, अमरापुर प्रतिनिधी श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात लोकनेते सहकार महर्षी मारुतरावजी घुले पा यांची ९६ वीं जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदु पा भोसले होते. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगा

# दोन अंगणवाड्या धोकादायक; चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ!

## दोन वर्षांपासून इमारती धोकादायक; पर्यायी खोल्याही गैरसोयीच्या, बालकांच्या शिक्षणावर परिणाम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** कोरडगावातील दोन अंगणवाडी केंद्रांच्या इमारती गेल्या दोन वर्षांपासून धोकादायक अवस्थेत असून, या इमारतींमध्ये चिमुकल्यांना बसविणेही बंद करण्यात आले आहे. त्यामुळे अंगणवाडीतील बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, त्यांना बसविण्यासाठी करण्यात आलेली पर्यायी व्यवस्थाही कुचकामी ठरत असल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चिमुकल्यांच्या शिक्षणाची आणि सुरक्षिततेची अक्षरशः फरफट होत आहे.

अंगणवाडीची मूळ इमारत धोकादायक झाल्याने ग्रामपंचायतीकडून एका खोलीची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, ही खोलीदेखील सुरक्षित नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे धोकादायक इमारतीऐवजी दुसरी धोकादायक खोली, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. लहान बालकांना अशा ठिकाणी बसविणे कितपत सुरक्षित आहे, असा संतप्त सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

दुसऱ्या अंगणवाडीची व्यवस्था राममंदिराजवळील एका खोलीत करण्यात आली आहे. मात्र, ही खोली अंधारी असून तेथे अडगळीचे साहित्यही ठेवण्यात आले आहे. त्यातच सदर खोली मंदिराची असल्याने दररोज विविध धार्मिक कार्यक्रम सुरू असतात. कार्यक्रमांदरम्यान होणाऱ्या कर्णकर्कश ध्वनिमुळे चिमुकल्यांना शिकणे, ऐकणे आणि लक्ष केंद्रित करणे जिकिरीचे होत आहे.

### अंगणवाडी की अडगळखाना?

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडी केंद्रामध्ये स्वच्छ, सुरक्षित, प्रकाशमान आणि शांत वातावरण असणे आवश्यक आहे. मात्र कोरडगावात धोकादायक इमारत, अंधारी खोली, अडगळीचे साहित्य आणि सतत सुरू असलेले धार्मिक कार्यक्रम यामुळे अंगणवाडीची अवस्था चिंताजनक झाली आहे. अशा वातावरणात बालकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न म्हणजे त्यांच्या मूलभूत हक्कांशी तडजोड करण्यासारखे असल्याची भावना पालक व्यक्त करीत आहेत.

### दोन वर्षे झाली, तरी नवीन इमारतीचा प्रश्न जैसे थे




(काल्पनिक छायाचित्र)

अंगणवाडीच्या इमारती धोकादायक होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटला असतानाही अद्याप कायमस्वरूपी सुरक्षित इमारतीची व्यवस्था झालेली नाही. त्यामुळे संबंधित विभाग नेमका कोणत्या दुर्घटनेची वाट पाहत आहे? एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

### बालकांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको

अंगणवाडीतील बालके ही गावाची भावी पिढी आहे. त्यांच्या सुरक्षिततेबरोबरच शिक्षणासाठी योग्य वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे दोन्ही अंगणवाड्यांसाठी तातडीने सुरक्षित, प्रशस्त, हवेशीर व प्रकाशमान पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच धोकादायक इमारतींची तातडीने पाहणी करून नवीन इमारतींच्या बांधकामाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी पालक व ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाने आता तरी गांभीर्याने दखल घेऊन चिमुकल्यांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दखल

### जिल्हा बँक प्रतिनिधी निवडीवरून रस्त्यात अडवाअडवी

भोर : आपटी, ता. भोर येथील विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी प्रतिनिधी निवडीवरून राजकारण तापले आहे. बैठकीला जाणाऱ्या संचालकांच्या मोटारी रस्त्यात अडवून शिवीगाळ व दमदाटी केल्याच्या दोन तक्रारी भोर पोलिस ठाण्यात दाखल झाल्या आहेत.

विनोद गुलाब खुटवड हे वडिलांसह आपटी येथील सोसायटीच्या बैठकीला जात असताना नितीन भिकोबा थोपटे, रा. खानापूर आणि दत्तात्रय परखंदे, रा. निगुडघर यांनी रस्त्यात मोटार अडवून शिवीगाळ व दमदाटी केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.दुसऱ्या तक्रारीनुसार, दत्तात्रय परखंदे, जगन्नाथ पारठे, लक्ष्मण गायकवाड, वसंत कुडले, जनाबाई पारठे आणि सिंधू मादगुडे हे सोसायटीच्या बैठकीसाठी जात असताना अप्पा खुटवड, रा. नांदगाव, जयवंत चव्हाण, रा. हातनोशी आणि अन्य दोघांनी मोटार आडवी लावून धक्काबुक्की व शिवीगाळ केली. मोटारीचा रस्ता अडवल्याने जिल्हा बँक प्रतिनिधी निवडीच्या ठरावाच्या बैठकीला जाता आले नसल्याचे तक्रारीत नमूद आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक निलेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### लिपिक-टंकलेखकांची राज्यभर रिक्त पदांवर नियुक्ती

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ आणि मुख्य परीक्षा २०२५च्या माध्यमातून निवड होणाऱ्या लिपिक-टंकलेखक संवर्गातील उमेदवारांची नियुक्ती राज्यातील संबंधित संवर्गाच्या रिक्त पदांवर करण्यात येणार आहे.

आयोगाच्या जाहिरात क्रमांक १२४/२०२५ नुसार संयुक्त पूर्व परीक्षा, तर जाहिरात क्रमांक ०१४/२०२६ नुसार मुख्य परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेतून नोंदणी व मुद्रांक विभागातील लिपिक-टंकलेखक पदासाठी निवड होणाऱ्या उमेदवारांना केवळ एका विभागापुरते मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रातील रिक्त पदांवर नियुक्ती मिळणार आहे. निवड होणाऱ्या उमेदवारांना राज्यातील विविध ठिकाणी कार्य करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे नोंदणी व मुद्रांक विभागाने स्पष्ट केले आहे. संबंधित परीक्षार्थी व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विभागाने केले आहे.

### पुणे जिल्ह्यात ३० ठिकाणी रोजगार मेळावे

**पुणे :** युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत २९ सप्टेंबर रोजी राज्यभरात एकाच दिवशी ५०० हून अधिक रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहेत.पुणे जिल्ह्यात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विविध तालुक्यांतील ३० शैक्षणिक संस्थांमध्ये रोजगार मेळावे घेण्यात येणार आहेत.

यामेळाव्यांमध्येविविधनामांकितउद्योग, कंपन्यावआस्थापनांचा सहभाग राहणार असून, शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार उमेदवारांची निवड केली जाणार आहे.युवकांना त्यांच्या जिल्ह्यात किंवा परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ मिळवून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. शासन, उद्योग-आस्थापना आणि रोजगार इच्छुक युवक-युवती यांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे.पुणे जिल्ह्यातील रोजगार इच्छुक युवक-युवतींनी या मेळाव्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने केले आहे. अधिक माहितीसाठी रास्ता पेठ, पुणे येथील केंद्राशी संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१३३६०६ आहे. रोजगारविषयक माहितीसाठी रोजगार महा स्वयंम संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.

### काकडे महाविद्यालयात आविष्कार संशोधन कार्यशाळा

**सोमेश्वरनगर :** मु. सा. काकडे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि आविष्कार संशोधन स्पर्धा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आविष्कार संशोधन स्पर्धा मार्गदर्शन कार्यशाळा झाली.

अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर येथील प्रा. डॉ. किरण रणदिवे यांनी विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्पाची निवड, प्रकल्प तयार करण्याची पद्धत, पेटंटपर्यंतचा प्रवास तसेच स्पर्धेचे नियम व अटी याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन स्पर्धा समितीचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी अध्यक्षीय मनोगतात आविष्कार स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त बुद्धिमत्तेला वाव मिळून वैज्ञानिक दृष्टिकोन व संशोधनात्मक विचारांना व्यासपीठ मिळते, असे सांगितले.

# अभियंत्यांच्या अनुभवाचा जलव्यवस्थापनासाठी उपयोग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** जलसंपदा विभागातून निवृत्त झालेल्या अनुभवी अभियंते व अधिकाऱ्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा राज्याच्या भविष्यातील जलव्यवस्थापनासाठी उपयोग करून घ्यावा. यासाठी जलसंपदा विभाग तसेच प्रत्येक महामंडळाच्या स्तरावर सल्लागार मंडळ स्थापन करण्याबाबत विचार करावा, असे मत जलसंपदा विभाग, गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.



यशवंतराव चव्हाण विकास व प्रशासन प्रबोधिनी येथे जलसंपदा विभागातर्फे आयोजित अभियंता गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्रकल्प समन्वय सचिव जयंत बोरकर, लाभक्षेत्र विकास विभागाचे सचिव प्रकाश मिसाळ यांच्यासह विविध महामंडळांचे कार्यकारी संचालक उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, राज्यातील शेती व जलव्यवस्थेसाठी अभियंत्यांचे योगदान मोठे आहे. जलव्यवस्थापन व सिंचन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्याची गरज आहे. जलसंपदा विभागातील पुरस्कारांची संख्या वाढविण्याची मागणी लक्षात घेऊन पुढील वर्षापासून प्रत्येक महामंडळासाठी तीन ते पाच पुरस्कार देण्यास मान्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

**धरणातील पाणी शेतापर्यंत पोहोचविणे उद्दिष्ट :**

जलसंपदा विभाग, विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे मंत्री गिरीश महाजन यांनी धरणे बांधण्याबरोबरच त्यातील पाणी शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचविणे आणि प्रत्येक थेंबाचा कार्यक्षम वापर करणे हे विभागाचे उद्दिष्ट असावे, असे सांगितले. पाइपद्वारे वितरण, ठिबक व तुषार सिंचनामुळे पाण्याची गळती व बाष्पीभवन कमी करण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. धरणातील गाळ काढणे, वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही भविष्यातील महत्त्वाची आव्हाने असल्याचे त्यांनी नमूद केले.

**प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर :**

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी जलप्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी भूसंपादन, वन व पर्यावरण मंजुरी तसेच पुनर्वसनाच्या बाबींचे प्रभावी नियोजन आवश्यक असल्याचे सांगितले. सुमारे सहा हजार तांत्रिक मनुष्यबळाला प्रोत्साहन देण्यासाठी अभियंता पुरस्कारांची संख्या वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जलसंवर्धन, पाणी व्यवस्थापन, सिंचन वाढ आणि लोकसहभागासाठी नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

**अभियंता पुरस्कारार्थींचा गौरव :**

या वेळी २०१९ ते २०२४ या कालावधीतील वैयक्तिक व सांघिक पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात आला. यामध्ये प्रकाश बाबूराव भोसले, प्रवीण पांडुरंग पारस्कर, निलेश गुरुनाथ भोईर, सचिन पुंडलिक पवार, मंगेश त्र्यंबकराव त्रिपिटे, समाधान धोंडीबा सर्पेलवार, अरुण रामचंद्र नाईक, सायली राजेंद्र पाटील, प्रमोद पुंजाजी महाले, विजय हरी पाटील, संजीव दगडू चोपडे, गोकुळ श्रावण महाजन, प्रवीण वसंतराव देशमुख, धनंजय महादेव कोकरे, जयपाल संजय चौरासिया, अजित भारत गौड, अनिता उदय पराते आणि राजरत्न महादेवराव रणदिवे यांचा समावेश आहे. विविध पाटबंधारे मंडळे, प्रकल्प व विभागीय पथकांनाही सांघिक पुरस्कार देण्यात आले.

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या अभियंता दिनानिमित्त शुभेच्छा संदेशाची चित्रफित दाखविण्यात आली. तसेच राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ मध्ये महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

## सुपा घाटात विद्यार्थ्यांची एसटी बस पलटी; मोठी जीवितहानी टळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत :** दौंड आणि बारामती तालुक्यांच्या सीमेवरील सुपा घाटात विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी एसटी बस बुधवारी सकाळी साडेसात ते आठच्या सुमारास पलटी झाली. घाटातील पहिल्या धोकादायक वळणावर चढत असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. बसमध्ये सुमारे २० ते २५ विद्यार्थी प्रवास करत होते. यातील काही विद्यार्थी जखमी झाले असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

**युगेंद्र पवारांकडून जखमी विद्यार्थ्यांची रुग्णालयात जाऊन चौकशी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते व विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेचे खजिनदार युगेंद्र पवार यांनी रुग्णालयात जखमी विद्यार्थ्यांची चौकशी केली. सर्व अपघात ग्रस्त विद्यार्थ्यांच्या संपूर्ण वैद्यकीय खर्च विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेतर्फे केला जाईल.**

**-युगेंद्र पवार**


जखमी विद्यार्थ्यांना लोणी काळभोर येथील विश्वराज रुग्णालय तसेच चौफुला येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. आमदार राहुल कुल आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी जखमी विद्यार्थी तसेच डॉक्टरांशी संपर्क साधून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते तथा विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेचे खजिनदार युगेंद्र पवार यांनी रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थ्यांची चौकशी केली. सर्व अपघातग्रस्त विद्यार्थ्यांचा संपूर्ण वैद्यकीय खर्च विद्या प्रतिष्ठान शैक्षणिक संस्थेतर्फे करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.सुपा घाटात यापूर्वीही वारंवार अपघात झाले आहेत. तीव्र चढ-उतार, अरुंद रस्ता, चढावर बंद पडणारी अवजड वाहने आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेमुळे घाट धोकादायक बनला आहे. रस्त्याचे रुंदीकरण, सिमेंटचे संरक्षण कठडे तसेच धोकादायक चढ-उताराची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिक व वाहनचालकांकडून सातत्याने केली जात आहे. आम्ही नियमित कर भरतो; मग आमच्या लहान मुलांना अशा धोकादायक रस्त्यावरून प्रवास का करावा लागतो? केवळ आश्वासने नकोत, तर सुपा घाटाची तातडीने दुरुस्ती करून विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित करावा.

## गौराईच्या आगमनाने घराघरात उत्साह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**यवत :** गणेश चतुर्थीनंतर येणाऱ्या गौरी अर्थात महालक्ष्मी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी घराघरांत गौराईचे आगमन होणार आहे. गौरीच्या स्वागतासाठी महिला वर्गाची लगबग सुरू असून, घरांमध्ये सजावट, आरास आणि नैवेद्याची तयारी करण्यात आली आहे.

गौरी उत्सव तीन दिवस साजरा केला जातो. पहिल्या दिवशी गौरीचे आवाहन व पूजन, दुसऱ्या दिवशी गौरी भोजन, तर तिसऱ्या दिवशी गौरी-महालक्ष्मीचे विसर्जन केले जाते. त्यामुळे तीन दिवस घराघरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असते.

गौरीचे मुखवटे परातीत घेऊन कुंकवाची पावले उमटवत तुळशीजवळ पूजा केली जाते. त्यानंतर विधिवत गौरीला घरात आणून सजविले जाते. गौरीपुढे आकर्षक आरास करून सायंकाळी भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखविला जातो. गौरी जोडीने विराजमान होत असल्याने त्यांचा शृंगारही आकर्षक व एकसारखा केला जातो.

गौरीची पूजा, आरती व नैवेद्य झाल्यानंतर पुढील वर्षी पुन्हा येण्याचे आमंत्रण देत गौरीला निरोप दिला जातो. तिसऱ्या दिवशी गौरीचे वाजत-गाजत विसर्जन केले जाते. त्यामुळे आनंदोत्सवासोबतच निरोपाच्या वेळी भावनिक वातावरणही निर्माण होते.

## सुधाकर बोराटे यांची तालुकाप्रमुखपदी निवड

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या इंदापूर तालुका प्रमुखपदी सुधाकर बोराटे यांची निवड करण्यात आली. संस्थापक-अध्यक्ष मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोरगरीब, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांमध्ये राखीव खाटांचा लाभ मिळवून देणे, मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रियेसाठी मदत करणे तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये उपचार मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी बोराटे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. गंभीर व खर्चिक शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांना पक्षप्रमुख वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक ट्रस्ट, टाटा ट्रस्ट आदी माध्यमांतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठीही ते प्रयत्न करणार आहेत. या वेळी जिल्हा समन्वयक महेश लोंढे, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सतिश गावडे, उपजिल्हाप्रमुख सुनील निंबाळकर, बारामती तालुका समन्वयक पुष्पांजली जडे, डॉ. अनिल जडे, विद्या गायकवाड आदी उपस्थित होते.

## पुणे ईएमएमआरसी केंद्र देशात दुसरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्राने ईएमएमआरसीने जानेवारी ते जून २०२६ या सत्रात देशातील सर्व ईएमएमआरसी केंद्रांमध्ये द्वितीय क्रमांकाचे स्थान मिळविले. नवी दिल्ली येथील शैक्षणिक संप्रेषण संघाच्या वतीने केंद्राला या कामगिरीबद्दल प्रशंसापत्र देण्यात आले.

उच्च दर्जाचे मोठ्या प्रमाणावरील ऑनलाइन खुले अभ्यासक्रम तयार करणे, स्वयंम या ऑनलाइन शिक्षण मंचावरील अभ्यासक्रम ंमध्ये विद्यार्थीकेंद्रित आशयाची निर्मिती करणे तसेच विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन ईएमएमआरसी पुण्याचा गौरव करण्यात आला.

ईएमएमआरसी पुण्याच्या माध्यमातून आतापर्यंत ४७ ऑनलाइन खुले अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. यापैकी जानेवारी ते जून २०२६ या सत्रात विद्यापीठाच्या वतीने स्वयंम मंचावर १३ अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य आहेत. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना देशभरातील तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक साहित्य ऑनलाइन उपलब्ध होत आहे.ऑनलाइन अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पारंपरिक वर्गशिक्षणाच्या पलीकडे लवचिक, गुणवत्तापूर्ण आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी मिळत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसीने कळविणेत येते की, १) गाव मौजे करंजेपुल येथील शेत जमीन गट नं. १९६ क्षेत्र २हेक्टर ६६आर यांची चतु:सिमा मुळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे असे. सदर गटातील आमचे अशीलांचे मालकीचे संपूर्ण क्षेत्र ०० हेक्टर २० आर (वीस आर) विहीर बागायत शेतजमीन श्री. प्रकाश नारायण शेंडकर राहणार शेंडकरवाडी, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे यांना मुदत ६० महिने (पाच वर्ष) करीता मुदत खरेदी दिली असून यांस रस्ता वहिवाट करण्याचे हक्कासह दिलेले क्षेत्र.

यासी **चतुः सिमा पूर्वेस- लिहून घेणार यांचे क्षेत्र. दक्षिणेस- शासकीय रुग्णालय.पश्चिमेस- श्री. शहाजी गुलाब शेंडकर यांचे क्षेत्र.उत्तरेस- ग. नं. २९४**

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक वर्णन केलेले विहीर बागायत शेतजमीन त्यातील तदंगभूत वस्तूसह व रस्त्याचे वहिवाटीचे इजमेंटचे हक्कासह अशी मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे. (यापुढे सोयीकरिता 'वाद मिळकत' असा उल्लेख केला आहे.)

२) वरती कलम नं. १ मध्ये वर्णन केलेली वाद मिळकत आमचे अशीलांची मालकीची जमीन आहे. श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांची पत्नी व आमचे अशीलांची पत्नी या सख्ख्या बहिणी असल्यामुळे श्री. प्रकाश नारायण शेंडकर हे आमचे अशीलांचे नात्याने धाकटे साडूभाऊ लागत आहेत. असे श्री. प्रकाश नारायण शेंडकर व आमचे अशीलांचे अतिशय जवळचे नातेसंबंध आहेत. श्री. प्रकाश नारायण शेंडकर हे पोलीस खात्यामध्ये नोकरीस होते. ते आता सेवानिवृत्त झाले आहात. दुर्दैवाने श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांची पत्नी आणि आमचे अशीलांची पत्नी या दोघी बहिणी मयत झाल्या आहेत. आमचे अशीलांची पत्नी कर्करोगामुळे दिनांक ३१/१२/२०१९ रोजी मयत झाली आहे. आमचे अशीलांना प्रापंचिक खर्चासाठी व इतर कायदेशीर देणी देण्याकरिता रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) या रकमेची गरज भासली म्हणून आमचे अशीलांनी श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांचेकडे हातउसनी रक्कम रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) ची मागणी केली होती. सदर रक्कम बिनदस्त आमचे अशीलांना श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांनी घरीच दिली आहे. त्या बदल्यात आमचे अशीलांनी श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांना दिनांक २७/११/२०१९ रोजी ६० महिने (पाचवर्ष) मुदतीचे मुदतखरेदीखत लिहून दिले आहे. सदर मुदतखरेदीखत बारामती येथील मे. दुय्यम निबंधक यांचे कार्यालयामध्ये बमत/६१६०/२०१९ या क्रमांकाकडे नोंदविले आहे.

३) सदर दस्त हा पूर्णपणे गहाण स्वरुपाचाच होता. परंतु श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांचे मनात काय काळेबेरे होते हे आमचे अशीलास सुरुवातीपासून समजले नाही. ६० महिने पूर्ण व्हायच्या आधीच आमचे अशील तुमचेकडे रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) घेऊन आले होते, परंतु मुलांची लग्ने होऊ दे नंतर मी तुला तुझी जमीन परत करीन असे श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांनी त्यांच्या मुलाच्या डोक्यावर हात ठेऊन शपथ घेऊन सांगितले होते. त्यामुळे तसेच श्री. प्रकाश नारायण शेंडकर हे आमचे अशीलांचे साडू असल्यामुळे आमचे अशीलांनी श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांच्या बोलण्यावरती पूर्ण भरवसा ठेवला होता. परंतु नुकतेच पंधरा दिवसांपूर्वी आमचे अशीलांनी श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांचेकडे वाद मिळकत सोडवून देण्याची मागणी केली असता, तुला जमीन देत नाही. काय तुला करून घ्यायचे ते घे अशी भाषा श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांनी केली आहे. या कामी आमचे अशीलांनी श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांना रजिस्टर पोष्टाने स्वतंत्र कायदेशीर नोटीस पाठवून वरती कलम नं. १ मध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे अशीलांना सोडवून देण्याची मागणी आहे. तथापी वरती कलम नं. १ मध्ये वर्णन केलेल्या वाद मिळकतीचे संदर्भात श्री. प्रकाश नारायण शेंडकर हे त्रयस्थ इसमांशी मुद्दाम व्यवहार करणेचे विचारात आहेत असे आमचे अशीलांना समजल्यामुळे प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रकाशीत करणे गरजेचे झाले आहे.

४) तरी तुम्हांस कळविण्यात येते की, वरती कलम नं. १ मध्ये वर्णन केलेल्या वाद जमिनीचे संदर्भात श्री. प्रकाश नारायण शेंडकर राहणार शेंडकरवाडी, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे यांचेबरोबर खरेदी, विक्री, गहाण, दान, साठेखत, लीज, लीन, तारण गहाण, कर्ज तारण अगर इतर कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा अगर ताबा हस्तांतरणाचा व्यवहार कोणीही करू नये. असे आपण जर करताल तर त्याचे होणारे खर्चास, परिणामांस पूर्णपणे आपणच जबाबदार राहताल याची नोंद घ्यावी. उपरोक्त वादमिळकत सोडवून मिळणे करिता आणि श्री. प्रकाश नारायण शेंडकर यांचेशी झालेला सदरचा व्यवहार रद्द करणेकरिता लवकरच आमचे अशील योग्य त्या दिवाणी कोर्टामध्ये दावा दाखल करून दाद मागणार आहेत. याची नोंद घेण्यात यावी. येणेप्रमाणे नोटीस असे.

बारामती
दिनांक : १७.०९.२०२६

(श्री. भिमराव मार्तंड शेंडकर, मुळ राहणार शेंडकरवाडी,
सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.
सध्या राहणार एम. एस. ३, रुम नं. ९८४, पोष्ट ऑफिसजवळ कोपर खैरणे, ठाणे
४००७०९ यांचे करीता) बारामती, जि. पुणे.

**श्री. ए. जी. गावडे**
ॲडव्होकेट
पत्ता- दत्तसागर रेसिडन्सी, फ्लॅट नं. ७ व ८ गुजर इस्टेट,
हरिकृपानगर, बारामती, ता. बारामती, जि. पुणे ४१३१०२
मोबाईल नं. ८२०८२८३६७९


## डेक्कन स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** हलवाई चौक गणेश मित्र मंडळाच्या हलवाई गणेशासमोर डेक्कन एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. गणेशोत्सवानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

यावेळी डेक्कन स्कूलचे प्राचार्य डॉ. समीर ओंकार यांनी अथर्वशीर्षाचे महत्त्व सांगून शाळेतील विविध उपक्रमांची माहिती दिली. मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

मंडळाचे अध्यक्ष मयूर काळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सतीश धुमाळ यांनी केले. आभार अशोक काळे यांनी मानले. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष वैभव लांडे, शरद मुसळे, माजी अध्यक्ष रणजीत गायकवाड, अशोक काळे, प्रेम मुसळे, श्याम परदेशी, अविनाश जाधव, प्रणव मुसळे, बाळासाहेब ढोबळे, सिंकदर मन्यार, रमणलाल मुसळे, नारायण काळे, श्याम कोळपकर, शिक्षक सखाराम पुरी आदी उपस्थित होते.




हलवाई चौक गणेश मित्र मंडळाकडून धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जातात. मंडळाने विसर्जन मिरवणुकीवरील खर्चातून बचत करून परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. महिलांसाठी सामूहिक आरती, वृक्षरोपवाटप, विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप, पोलिस व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान, आरोग्य शिबिरे, स्वच्छता अभियान तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप असे उपक्रमही राबविले जातात.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना 'प्रेरणादायी शिक्षक' पुरस्काराने गौरविण्यात येते. आतापर्यंत ३५ हून अधिक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला आहे. कोरोना काळात गरजू नागरिकांना अन्नधान्य किट तसेच पूरग्रस्तांना मदत करण्यात आली. विविध धर्मांचे नागरिक मंडळाच्या उपक्रमांत सहभागी होत असून पुणे ग्रामीण पोलिसांकडूनही मंडळाच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, श्री राजा ऊर्फ मारुती कृष्णा सुर्यवंशी, रा. PWD 13/4, Ayyappa Temple Road, Pimpri, पुणे 411017. यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन MH-12 -SQ-0572 असे असून त्याचा इंजिन नंबर: D4HBKH676265, चासी नंबर:MZBMC81AMLN001539 असा असून सदर चार चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार मुलगा श्री सारंग मारुती सुर्यवंशी यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पुणे आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**श्री सारंग मारुती सुर्यवंशी**
**F-12, औंध, पुणे-411007**
दिनांक 17/09/2026

## द•ख•ल

### ऊस उत्पादनात वजन देणाऱ्या रामेश्वर गलांडेचा ज्ञानेश्वर कारखान्याकडून सन्मान



**हातगाव :** ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय समजला जात असून ओलिताखाली असणाऱ्या शेती व्यवसायातून आपल्याला जास्तीत – जास्त आर्थिक फायदा कसा मिळेल व तो मिळवण्यासाठी प्रत्येक शेतकरी धडपड करत असताना आपण पाहत आहोत. ऊसाचे नगदी पीक म्हणून शेतकऱ्यांचे ऊस पिकाकडे जास्त लक्ष असून आपण लागवड केलेल्या ऊस पिकाचे जास्तीत – जास्त वजन कसे वाढेल यासाठी वेग – वेगळे प्रयोग करून ऊस पिकांचे वजन देणाऱ्या शेतकऱ्याचा सन्मान करणे गरजेचे असल्याने याच विषयाला अनुसरून ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ उभी करणारे संस्थापक,अध्यक्ष स्व.मारूतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीचे औचित्य साधून जो कार्यक्रम कारखाना स्थळावर पार पडला आहे. त्या कार्यक्रमात कारखान्याच्या संचालक मंडळाने कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद असणाऱ्या ज्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतात ऊसाची लागवड करून एकरी जास्तीत – जास्त उत्पादन मिळवले आहे अशा शेतकऱ्यांचा फेटा बांधून शाल, श्रीफळ व प्रशस्ती पत्र देऊन गुरूवर्य महंत ह. भ. प.उद्धव महाराज मंडलिक, कारखान्याचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले, माजी आ. चंद्रशेखर घुले, माजी आ. पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख व काकासाहेब नरवडे, डॉ. क्षितिज घुले या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला असून त्या मध्ये शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील कुशल शेतकरी रामेश्वर मोहनराव गलांडे यांचाही समावेश असल्याने त्यांनाही सदर कार्यक्रमात अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या शुभ हस्ते सन्मानित करण्यात आले असून या सन्मानामुळे गलांडे यांचे हातगावसह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

### विघ्नहर्ता पतसंस्थेचे चेअरमन साठे यांचे चळवळीतील कार्य सामाजिक : महाराज सरकटे



**निघोज :** सहकार चळवळीत काम करताना विघ्नहर्ता पतसंस्थेच्या माध्यमातून चेअरमन सुभाष साठे व सर्व संचालक मंडळाने गोरगरीब जनतेला आर्थिक समृद्धीसाठी खऱ्या अर्थाने आधार दिला हाच सेवाभाव म्हणजे एक धार्मिक कार्य असून माणवी सेवेतच ईश्वरी सेवा असल्याचे प्रतिपादन गुरूवर्य तुळशीराम महाराज सरकटे यांनी व्यक्त केले आहे. विघ्नहर्ता पतसंस्थेने निघोज एस टी बस स्थानक परिसरात स्वतः जागेत स्थलांतर केले आहे. स्थलांतर कार्यक्रमाचे उदघाटन सरकटे महाराज यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यालयासह इतर ५ शाखा मिळून पुणे व नगर जिल्हयातील सहकार क्षेत्रात कार्यरत पतसंस्थेने अल्पावधीत लौकिक मिळविला आहे. यावेळी कार्यक्रमाच्या निमित्ताने व्हा.चेअरमन अजित मदगे,संचालक अशोक कारखिले, रवींद्र कर्डीले, भाऊसाहेब गाडेकर, संतोष कळसकर, दादाभाऊ गायकवाड, गजाबा कऱ्हे, वैशाली लाळगे, सुशांत साठे, साहेबराव हिंगे, विष्णू गाडीलकर व सर्व शाखांचे सल्लागार मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक बबन बेलोटे, प्रशासन प्रमुख रोहन साठे , मुख्य वसुली अधिकारी प्रशांत खोडाळ यांच्या सह सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद ठुबे यांनी केले शेवटी संस्थेचे व्हा. चेअरमन अजित मदगे यांनी आभार मानले.

### वडगाव सावताळ येथे मोफत डोळे तपासणी शिबिर



**टाकळी ढोकेश्वर :** असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी या हेतूने डॉ. विखे पाटील फाउंडेशन आणि अनुलोम यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या वडगाव सावताळ येथे बुधवार रोजी मोफत डोळे तपासणी आणि उपचार शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी रुग्णाचा शुगर आणि बीपी देखील चेक करण्यात आला. परिसरातील सर्व नागरिकांनी भरभरून प्रतिसाद देऊन शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यास मदत केली. या उपक्रमासाठी ज्ञानेश्वर हारदे, प्रसाद तोटे, डॉ.सागर देवकर यांनी रुग्णांना सेवा दिली. यावेळी सरपंच संजय रोकडे, ज्ञानदेव शिंदे, धनंजय शिंदे, सुनील शिंदे, बाबासाहेब लोखंडचूर, सुनील लक्ष्मण रोकडे, माणिक कांडेकर, भाऊ शिंदे, राजेंद्र भोसले, बाळासाहेब धोंडीबा रोकडे, उमेश रोकडे, भाऊसाहेब कोंडीबा शिंदे, विजय नारायण शिंदे, राधुजी शिंदे,अशोक कृष्णाजी शिंदे, गुलाब रामचंद्र रोकडे, कैलास खामकर, संतोष खरमाळे आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी राजेंद्र बाळासाहेब रोकडे, नंदकिशोर खामकर, सागर करगळ, बाळासाहेब शिंदे, प्रतीक लोळगे, संकल्प धनंजय शिंदे, अमोल घोडके, शुभम ईश्वरे, उत्तम शिंदे, विठ्ठल बर्डे, शंकर शिंदे, योगेश शिंदे, जगदीश शिंदे, किरण शिंदे, कुणाल शिंदे, मल्हारी जांभळकर, कैलास भोबाळ,रवी शिंदे, स्वप्नील गायकवाड, विजय केदारी, प्रथमेश आंबेकर, वामन रोकडे, अक्षय आंबेकर, राकेश खामकर, शैलेश जांभळकर, बाबासाहेब भोबाळ, रामदास गांगुर्डे, राजू केदारी, राहुल जांभळकर, मंगेश वाकळे, गणेश वाकळे, आकाश केदारी, देवानंद क्षीरसागर, अतुल शिंदे, अमोल शिंदे, अंकुश शिंदे, पियुष शिंदे, प्रदीप शिंदे, राहुल शिंदे, आकाश शिंदे, सत्यवान बाळासाहेब शिंदे, योगेश वसंत शिंदे, प्रसाद अशोक शिंदे, प्रसाद लहू शिंदे, अविनाश शिंदे, भाऊसाहेब नरसाळे, रोहित भनगडे, सुदाम पवार, संपत पवार, ऋषिकेश जाधव, सागर निवडुंगे, किरण खामकर यांनी बहुमोल सहकार्य केले.

# दप्तर पाठीवर..जीव मुठीत; विद्यार्थ्यांसाठी 'धोक्याची वाट'!

## जेऊरचे चौक अपघाताच्या 'छायेत'; उपाययोजनांची प्रतिक्षा कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील जेऊर येथील मुख्य चौक आणि महावितरण कंपनी चौक नागरिकांसाठी धोकादायक ठरत असून वारंवार अपघात होऊनही प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा मुहूर्त अद्याप सापडलेला नाही. या चौकांमध्ये यापूर्वी झालेल्या अपघातांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागला असून अनेक जण कायमचे अपंग झाले आहेत. त्यामुळे आणखी किती अपघातांची वाट पाहणार असा संतप्त सवाल पंचक्रोशीतील नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

**प्रत्यक्ष अंमलबजावणीची गरज !**

जेऊर मुख्य चौक व महावितरण चौकात सिग्नल लाईट, झेब्रा क्रॉसिंग, गतिरोधक, सूचना फलक व इतर वाहतूक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी आहे. अपघातांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीची गरज आहे.

छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून भरधाव वेगाने धावणारी वाहने आणि त्याच मार्गावरून रस्ता ओलांडणारे स्थानिक नागरिक यामुळे जेऊरच्या दोन्ही चौकांमध्ये अपघाताचा धोका कायम आहे. शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी




ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे.

धनगरवाडी, माळखास, चापेवाडी, इमामपूर, शेटे वस्ती, तोडमल वस्ती, गवारे वस्ती, आढाववाडी परिसरातून मोठ्या संख्येने विद्यार्थी सायकल तसेच पायी जेऊर येथे शिक्षणासाठी येतात. विद्यार्थ्यांना दररोज महामार्ग ओलांडावा लागतो. भरधाव वाहतूक आणि चौकातील वाहनांची वर्दळ पाहता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यापूर्वी शालेय विद्यार्थ्यांचेही अपघात घडले असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

अपघात टाळण्यासाठी सिग्नल लाईट यंत्रणा, झेब्रा क्रॉसिंग, गतिरोधक, सूचना फलक तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी वारंवार करण्यात आली आहे. मागणी करूनही प्रत्यक्ष उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

पंचक्रोशीतील नागरिकांना महामार्गावरून प्रवास करताना अक्षरशः जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे दोन्ही चौकांमध्ये तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमधून होत आहे.

**पालकांचा थेट सवाल?**

विद्यार्थ्यांचा दररोजचा महामार्ग प्रवास धोकादायक बनला आहे. अपघात होण्यापूर्वीच उपाययोजना करणे अपेक्षित आहे. अनुचीत घटना घडल्यानंतरच उपाययोजना होणार का ? असा संतप्त सवाल पालक व ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे.

## प्राचीन संस्कृतीचा जागर... गुहेत विराजमान विघ्नहर्ता!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** गणरायाच्या भक्तीला कल्पकतेची जोड, कलाविष्काराला सामाजिक जाणिवेची किनार आणि उत्सवाला संस्कृतीच्या संवर्धनाची झालर देत राजुरी (ता. जुन्नर) येथील इंदिरानगर परिसरातील समता गणेश मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवासाठी प्राचीन काळातील गुहेची हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. आकर्षक सजावट, कलात्मक बारकावे आणि प्राचीन संस्कृतीची अनुभूती देणारा हा देखावा भाविकांचे लक्ष वेधून घेत असून, विघ्नहर्त्या गणरायाच्या भक्तीत राजुरी परिसर न्हाऊन निघाला आहे.

सन १९९२ मध्ये सर्व जाती-धर्म-पंथातील नागरिकांना एकत्र घेऊन स्थापन झालेले समता गणेश मंडळ आज सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सांस्कृतिक जतनाचे प्रतीक बनले आहे. 'समता' या नावाला सार्थ ठरवत बारा बलुतेदार समाजासह विविध घटकांतील नागरिक दरवर्षी एकत्र येऊन श्री गणेशाची भक्तिभावाने पूजा-अर्चा करतात. मंडळाने आपल्या स्थापनेपासूनचा ३४ वर्षांचा अखंड प्रवास विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी समृद्ध केला आहे.

गणेशोत्सव म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नव्हे, तर कला, संस्कृती, सामाजिक प्रबोधन आणि लोकजागृतीचा उत्सव असावा, या भावनेतून मंडळाकडून दरवर्षी वैशिष्ट्यपूर्ण देखावे साकारले जातात. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, पारंपरिक, लोककला तसेच लोकजागृतीपर विषयांना कलात्मक रूप देण्याची मंडळाची परंपरा आहे. स्थापनेपासून मंडळाने गरुड, डायनासोर, नारळ गडवा, हनुमान, पर्णकुटी, ससा, मिनी जहाज, बदक, डोंगर, मोर, शेषनाग आदी विविध कलाकृतींनी सजलेले देखावे सादर केले आहेत. यंदाच्या प्राचीन गुहेच्या देखाव्यातून भारतीय संस्कृतीच्या प्राचीन वैभवाची आणि कलात्मक वारशाची झलक भाविकांसमोर उभी करण्यात आली आहे.

## मच्छीद्रनाथांचा प्रकटदिन उत्साहात साजरा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**तिसगाव :** मच्छीद्रनाथांची संजवन समाधी असलेल्या मायंबा येथे मच्छींद्रनाथांचा प्रकट दिन हजारो भावीकांच्या उपस्थित उत्सहात साजरा करण्यात आला . फटाक्याची अताषबाजी टाळ, मृदंगांचा ध्वनी, शंखनाद , ढोल ताशाचा निनाद अशा उत्साही वातावरण मंच्छीद्रनाथांचा जन्मोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न झाला

मंगळवारी पहाटे राधेश्याम भैय्या धस यांच्या हस्ते सपत्नीक मच्छिंद्रनाथांच्या पादुकाचे पूजन करून महाआरती केली . यावेळी देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे ,सचिव बाबासाहेब म्हस्के राजेंद्र म्हस्के , चंद्रकांत लोखंडे ,रमेश ताठे कैलास चंदनशिव ,ह भ प अशोक महाराज मरकड , पालवे महाराज यासह सावरगाव ,शेंडगेवाडी ग्रामस्थ व नाथ भक्त मोठया संख्येने उपस्थीत होते. नाथ संप्रदयाचे आदय चैतन्य मंच्छीद्रनाथांनी ऋषीपंचमी दिवशी अवतार घेतला . चैतन्य मंच्छीद्रनाथांचा गुढीपाडवा, पौष अमावस्या या उत्सवाप्रमाणेच रुषीपंचमीच्या कार्यक्रमासाठी राज्याच्या विविध भागागातील भाविक मांयबा गडावर येऊन विवीध प्रकारे सेवा करतात. देवस्थान समीती व भावीकांच्या उपस्थति मच्छीद्रनाथांच्या संजवन समाधी व मुर्तीची पहाटे महापुजा होऊन पैठण वरून आनलेल्या गंगेच्या पाण्याने मच्छीद्रनाथांच्या संजवन समाधीचा जलाभिषेक करण्यात आला . नवनाथ ग्रंथातील अवतार प्रकट होण्याच्या अध्यायाचे वाचन केले .सावरगाव शेंडगेवाडी ग्रामस्थांनी नाथांच्या अश्वाची वाजत गाजत मिरवणुक काढण्यात आली .यावेळी मच्छिंद्रनाथ गडावर हजारो भावी उपस्थित होते .स्थानीक महिला भजनी मंडळाच्या सदस्यांनी जन्माचा पाळण्याचे गायण करत विवीध मान्यवराच्या हस्ते पाळणा हलवण्यात आला . अनेकांनी नाथांच्या भक्तीत लीन होऊन फुगडी खेळत तालही धरला.बुलढाणा येथील ढोल पथकाने विविध वाद्ये वाजवणे, शिस्तबध्द पध्दतीत हालचाल करणे, मिरवणुकीत भावीकांना मंत्रमुग्ध केले. प्रगट दिनानिमीत्त फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई,आतषबाजी ब रंगीबेरंगी फुगे पताकांनी मुख्य मंदिरे सजवण्यात आली होते .येणाऱ्या भाविकांचे देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे व सचिव बाबासाहेब मस्के यांनी स्वागत केले

## वेळ, पैसा वाचवून आपसातील सलोखा टिकण्यासाठी लोकन्यायालय उत्तम पर्याय : न्या. कुलकर्णी

### शेवगाव लोक न्यायालयात ५० दाव्यांचा निपटारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**शेवगाव :** लोकन्यायालयात पैशाची तसेच वेळेची बचत होते . आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे दावे सामंजस्याने मिटत असल्याने एकमेकात कटुता निर्माण होत नसल्याने श्रम, वेळ व पैसा वाचवून आपसातील कटुता टाळायची असेल तर लोक न्यायालय हा उत्कृष्ट पर्याय आहे. असे मत शेवगावचे दिवाणी न्यायाधीश डी. आर. कुलकर्णी यांनी व्यक्त केले .

शेवगाव तालुका वकील संघ व तालुका विधी सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक न्यायालयालात्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आयोजित लोक न्यायालयास म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. यावेळी दाखल पूर्व ८०० दिवाणी फौजदारी दाव्यापैकी ४६ दावे तर ग्राम पंचायती, वीज महामंडळ व बँकाच्या थकित बिलाबाबत २ हजार ६५ ७ . दाव्या पैकी ४ अशा एकूण ५० दावे निकाली काढण्यात आले असून तब्बल ४० लाख ७३ हजार १२ ६ रुपये वसूल झाला आहे. या वसूल संदर्भात लक्षणिय बाब अशी की तडजोड करून थकबाकी देणारे ग्राहकांची यावेळी उपस्थिती होती. मात्र ती घेण्यासाठी संबंधित कर्मचारी उपस्थित नव्हते!

या सर्व दाव्यांचा निपटारा करण्याचे कामकाज शेवगाव न्यायालयाचे पहिले दिवाणी न्यायाधीश डी आर कुलकर्णी यांनी पाहिले.

विविध बँकांचे तसेच अन्य दावे मिटविण्या संदर्भात शेवगाव वकील संघाचे अध्यक्ष ॲड आरआर आगळे, ॲड. एमए शेख, ॲड. मनोहर थोरात,ॲड. एस बी भोसले, ॲड. संजय सानप, ॲड ए एम जाधव, ॲड. शैलेश भारदे, ॲड. एल. एच. लांडे, ॲड. के के गलांडे,सहा अधिक्षक राजेंद्र गोंधणे, विधिस. सेवा समितीचे बी बी मुरदारे, एच. आर. दिवटे, श्रीमती जीबी घनवट व पोलिस कर्मचार्यांनी विशेष सहकार्य केले.

## तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत चापडगाव विद्यालयाचे घवघवीत यश



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** क्रीडा व युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे विभाग, अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत शेवगाव तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींसाठी चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चापडगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या.

या तालुकास्तरीय स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील एकूण २६ संघांनी सहभाग नोंदविला. अत्यंत चुरशीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या स्पर्धेत चापडगाव विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत घवघवीत यश संपादन केले. या यशस्वी खेळाडूंना डॉ. विद्याधरजी काकडे, हर्षदाताई काकडे, प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, पृथ्वीसिंग काकडे, वंदना पुजारी, अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, संपत दसपुते, सुनिल जायभाये, संजय दुधाडे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे पूर्ण वातावरण क्रीडामय बनले होते.या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर तहकिक व सादिक शेख यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले.

# शेवगाव पाथर्डी तालुक्यातील गावांना सिंचनासाठी जायकवाडीचे पाणी मिळणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** व शेवगाव तालुक्यातील गावांच्या शेतीसाठी जायकवाडी नाथसागर धरणाचे पाणी पाईपलाईनच्या साह्याने देण्याच्या मागणीला शासनाकडून सकारात्मक दिशा मिळाली आहे. सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम सानप केलेल्या पाठपुरावाला यश आले असून यासंदर्भात सर्वेक्षण तसेच अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेश उपमुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी जलसंपदा सचिव यांना दिले होते . सानप यांच्या मागणीला दोन्ही तालुक्यातील जवळपास १०७ ग्रामपंचायती लेखी पाठिंबा दिला.

मागील आठवड्यात याबाबत सर्वेक्षण अंदाजपत्रक अहवाल सादर करण्यात आलेला आहे. अहवालात नमूद केलेले आहे की, नाथसागर जायकवाडी पैठण धरणातून पाईपलाईन च्या साह्याने पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील भालगाव, टाकळीमानुर, तिसगाव, पाथर्डी ,लाडजळगाव, बोधेगाव, कोरडगाव पंचायत समिती गणातील गावे तसेच पाथर्डी नगरपालिका हद्दीतील गावांच्या शेतीसाठी पाणी द्यावे. दोन्ही तालुक्यातील तलाव तसेच बंधारे




भरून दिले जाणार आहेत.. शेतीसाठी पाणी पाईपलाईनच्या साह्याने देणे हे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे ,असे अहवालात नमूद केले. त्याचप्रमाणे या प्रयोजनासाठी नाथसागर जायकवाडी पैठण धरणातील जवळपास पावणेतीन टीएमसी पाण्याची गरज आहे, हेही अहवालात नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी स्वाक्षरी करून फाईल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री यांच्याकडे पाठवली होती. स्थानिक लोकप्रतिनिधी व मोठ्या नेत्यांनी या योजनेला विरोध केला असला तरी शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण निश्चितच पाणी आणणार असून.

पुढील पाच वर्षांमध्ये जायकवाडी धरणाचे पाणी पाथर्डी व शेवगाव तालुक्याच्या शेतीसाठी मिळवून देणार आहे, असे मत तुळशीराम सानप यांनी स्पष्ट केले आहे.

# सुरेगावकर खाजगी बाजार समितीत डाळींबाला उंच्चांकी ६९०० तर कांद्याला ४९०० दर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**कोळपेवाडी प्रतिनिधी :-**
डाळींबाची आवक घटलेली असतांना देखील कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथील सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या डाळींब मार्केटमध्ये बुधवार (दि.१६) रोजी ३८० ते ४०० क्विंटल डाळींबाची आवक होवून सुलतानपूर येथील व्ही.डी.देशमुख या डाळिंब उत्पादक शेतकऱ्याला उंच्चांकी ६९०० रुपयांचा दर मिळाला आहे. तसेच एक नंबर कांद्याला ४९०० चा उंच्चांकी दर मिळाला असल्याची माहिती सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संस्थापक शशिकांत वाबळे यांनी दिली आहे.




मागील तीन वर्षापासून सुरेगाव येथे सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती सुरु झाल्यापासून कांदा,सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक बचतीबरोबरच वेळेची देखील बचत झाली आहे. त्यामुळे अल्पावधीतच सुरेगावकर बाजार समितीला शेतकऱ्यांची प्रथम पसंती मिळत आहे. शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेवून मागील वर्षापासून आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या सहकार्यातून संस्थापक शशिकांत वाबळे यांनी डाळींब मार्केट देखील सुरु केल्यामुळे राज्यातून २५० ते ३०० किलोमीटर एवढ्या दूरच्या अंतरावरून डाळींब उत्पादक शेतकरी या मार्केटला डाळिंब विक्रीसाठी घेवून येत आहे. शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार समितीत मिळणाऱ्या सुविधा, सन्मानाची वागणूक, मालाला मिळणारा योग्य दर आणि डिजिटल आर्थिक व्यवहारामुळे व्यवहार अधिक सुलभ व पारदर्शक होत आहेत.

> शेतकऱ्याच्या शेतमालाचे दर कधी कोसळतील, हे सांगता येत नाही. निसर्गाची परीक्षा तर शेतकऱ्याला सातत्याने द्यावीच लागते. अशा परिस्थितीत मोठ्या कष्टाने पिकवलेल्या डाळिंबाला सुरेगावकर खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या डाळिंब मार्केटमध्ये ३४५ रुपये किलोचा उच्चांकी दर मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि समाधानाचा क्षण आहे. मिळालेला हा चांगला दर दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी निश्चितच बळ आणि दिलासा देणारा आहे.
> **- व्ही. डी. देशमुख (डाळिंब उत्पादक शेतकरी)**

विशेष म्हणजे, राज्याच्या एका कोपऱ्यात असलेल्या सुरेगाव येथील डाळिंब मार्केटकडे दूरवरच्या शेतकऱ्यांचा ओढा निर्माण झाला आहे. डाळिंबाची आवक कमी असतानाही ३८० ते ४०० क्विंटलची झालेली आवक ही शेतकऱ्यांचा सुरेगावकर बाजार समितीवर असलेला वाढता विश्वास अधोरेखित करणारी ठरली असल्याचे संस्थापक शशिकांत वाबळे यांनी म्हटले आहे. बुधवारच्या बाजारात डाळिंबाला सरासरी ८० ते १३० रुपये किलो दर मिळत असताना नंबर एकच्या दर्जेदार मालाला ३४५ रुपये किलोचा उच्चांकी दर मिळाला. कांद्यालाही सरासरी ४० ते ४५ रुपये किलो दर असताना एक नंबर कांद्याला ४९०० रुपये क्विंटलचा उच्चांकी दर मिळाला. या विक्रमी दरामुळे डाळिंब व कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

'कष्टाने पिकवलेल्या डाळिंबाला मिळालेला दर दिलासा देणारा'

## वाळू वाहतुकीसाठी शेतातून बेकायदायदेशीर रस्ता देणाऱ्या शेतकऱ्यावर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी** : सात्रळ येथील प्रवरा नदीपात्रातून कथित अवैध वाळू वाहतुकीसाठी शेतातून रस्ता तयार केल्या प्रकरणी निलेश अन्नासाहेब नालकर, रा. सात्रळ, ता. राहुरी याच्या विरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी वैभव लक्ष्मण सावंत यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, तहसीलदारांच्या तोंडी आदेशानुसार ग्राम महसूल अधिकारी वैभव सावंत व कोतवाल संजय पलघडमल यांनी १२ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास सात्रळ येथील रामपूर रोड परिसरात पाहणी केली. त्यावेळी सात्रळ येथील गट क्रमांक ९५ मधून वाळू वाहतुकीसाठी रस्ता तयार करण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

सदर रस्ता निलेश नालकर यांच्या शेतातून प्रवरा नदीपात्रापासून डांबरी रस्त्यापर्यंत तयार करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या रस्त्यावर ठिक ठिकाणी वाळू पडलेली आढळून आल्याचाही दावा करण्यात आला आहे.

शेतातून रस्ता तयार करू नये, असे संबंधित शेतकऱ्यांना वारंवार सांगण्यात आले होते. मात्र डबर व मुरूमाचा वापर करून रस्ता तयार करण्यात आल्याने हा रस्ता कथित वाळू वाहतुकीसाठी तयार करण्यात आल्याची खात्री झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

शासनाची परवानगी नसताना शासकीय मालमत्ता असलेल्या वाळूच्या कथित चोरीस सहाय्य केल्याचा तसेच पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचा आरोप नालकर यांच्यावर करण्यात आला आहे.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १०४१/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम ४५,५२ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ३ व १५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## अखेर देसवंडीच्या मुख्याध्यापिकेवर निलंबनाची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी प्रतिनिधी**
तालुक्यातील देसवंडी येथील शिरसाट वस्ती जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सुलताना जावेद शेख-इनामदार यांच्या कार्यपद्धतीविरोधात देसवंडी येथील पालक व ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारी, आंदोलन तसेच शाळेला ठोकलेल्या कुलपानंतर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्या मुख्याध्यापिकेवर निलंबनाची कारवाई केली आहे. या संदर्भात मुख्याध्यापिका शेख - इनामदार यांच्या निलंबनाचाआदेश मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी काढला आहे. सदरील मुख्याध्यापिका सुलताना शेख इनामदार सन २०२५सप्टेंबर पासून देसवंडी जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीबाबत पालकांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे विविध तक्रारी केल्या होत्या. त्या नियमितपणे शाळेत उपस्थित राहत नसल्याचा आरोप पालकांनी केला होता. तसेच उशिरा शाळेत येणे, विनापरवाना गैरहजर राहणे आणि याबाबत विचारणा करणाऱ्या पालक व ग्रामस्थांशी अरेरावीची भाषा वापरणे अशा प्रकारच्या तक्रारी सुमारे आठ महिन्यापासून करण्यात येत होत्या. सहकारी शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामपंचायत तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांशी कथित उद्धट वर्तन केले जात असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले होते. विद्यार्थ्यांकडून शाळेची साफसफाई करून घेणे, त्यांना खासगी कामे सांगणे तसेच इतर कामे करून घेतली जात असल्याचे आरोपही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून करण्यात आले होते. संबंधित मुख्याध्यापिकेच्या या प्रकारामुळे पालक व ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. संबंधित प्रकरणी प्रशासनाने कारवाई करावी, या मागणीसाठी पालक व ग्रामस्थांनी आंदोलन केले. त्यानंतर संतप्त पालक व ग्रामस्थांनी शाळेला कुलूप ठोकून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. संबंधित मुख्याध्यापिकेच्या या गैर वर्तणुकीमुळे प्रशासनाने वेगाने हालचाली करून १५ सप्टेंबर रोजी मुख्याध्यापिका शेख इनामदार यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषद प्रशासनाच्या आदेशानुसार सुलताना शेख इनामदार यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबनाच्या कालावधीत त्यांनी मुख्यालय सोडू नये, तसेच सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय खासगी नोकरी किंवा व्यवसाय करू नये, अशा सूचना आदेशात देण्यात आल्या आहेत. निलंबन कालावधीतील प्रशासकीय कार्यवाही तसेच निर्वाह भत्त्याबाबतची जबाबदारी गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

## कुट्टी मशीनच्या नावाखाली ७ लाखांचा बनावट कर्ज घोटाळा
### बेलवंडीत महिलेची फसवणूक : जीवे मारण्याची धमकी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**अहिल्यानगर :-** शासकीय योजनेतून कुट्टी मशीन आणि त्यावर ३५ टक्के अनुदान मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिला शेतकऱ्याच्या नावावर ७ लाख रुपयांचे बनावट कर्ज काढून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पीडित महिलेने बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, संशयितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.




सौ. योगिता एकनाथ काळे (रा. बेलवंडी बुद्रुक, ता. श्रीगोंदा) यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या भावकीतील प्रमोद बाजीराव काळे याने शासनाची महिलांसाठी कुट्टी मशीन देण्याची योजना असल्याचे सांगून ३५ टक्के अनुदान मिळेल असे आमिष दाखवले. त्यानंतर मशीन मिळवून देण्याच्या बहाण्याने योगिता काळे यांच्याकडून काही कोऱ्या कागदपत्रांवर सह्या आणि अंगठे घेतले. तसेच, मिरजगाव (ता. कर्जत) येथील 'आनंद मशिनरी'चे चालक आनंद पाचपुते यांच्या दुकानात नेऊन मशीन लवकरच मिळेल असा विश्वास दिला.

काही दिवसांनंतर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बेलवंडी शाखेकडून काळे यांना फोन आल्यावर ७ लाख रुपयांचे कुट्टी मशीनचे कर्ज मंजूर झाले असून त्याचे हप्ते थकीत असल्याचे समजले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी याबाबत विचारणा केली असता, संशयित आरोपी प्रमोद काळे आणि आनंद पाचपुते यांनी त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली.

महिलेने पोलिसांत तक्रार करणार असल्याचे सांगताच आरोपींनी फोनवरून जातीय वाचक शिवीगाळ केली. पोलिसांत गेली तर जीवे मारू आणि कुटुंबावर खोट्या केसेस टाकू,'' अशी धमकी दिली. याप्रकरणी सौ. योगिता काळे यांनी बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे लेखी अर्ज दिला असून, आरोपींवर फसवणूक, जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करून न्याय व संरक्षण मिळावे या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसले आहे. यावेळी योगिता काळे, शिल्पा भोसले, जानवी चव्हाण, मोनाली भोसले, शशिकला भोसले, हालीम भोसले, एकनाथ काळे आदी.

## बिबट्यांचा पुन्हा सुळसुळाट
### पाळीव प्राण्यांवरील हल्ल्यांनी शेतकरी धास्तावले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी** : तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्यांकडून पाळीव प्राण्यांवर हल्ले होण्याच्या घटना वाढल्या असून, रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकीस्वारांनाही बिबट्यांचे दर्शन होत आहे. वनविभागाने गावोगावी पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



राहुरी शहरासह बारागाव नांदूर, देवळाली प्रवरा, ब्राम्हणी, उंबरे, डिग्रस तसेच पूर्व भागातील तांदूळवाडी, आरडगाव, कोंढवड, शिलेगाव, केंदळ, मानोरी, वळण, मांजरी, मुसळवाडी, पाथरे आणि पठार भागातील ताहाराबाद, म्हैसगाव आदी गावांमध्ये बिबट्यांचे दर्शन होत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. काही ठिकाणी बिबट्यांनी शेळ्या, मेंढ्या, कुत्रे, कोंबड्या व कालवडींवर हल्ले केल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

पूर्वी जंगलात वास्तव्य करणारे बिबटे वृक्षतोड व अधिवासातील बदलांमुळे मानवी वस्तीकडे येत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तालुक्याच्या पूर्व भागातील पाण्याची उपलब्धता, उसाची शेती आणि गिन्ही गवतामुळे बिबट्यांना पोषक वातावरण मिळत असल्याचेही सांगितले जाते.

अनेक गावांमध्ये दोन ते पाच बिबटे असल्याचा दावा ग्रामस्थांकडून केला जात असून, काही ठिकाणी एकापेक्षा अधिक बिबटे व त्यांची बछडे दिसून येत आहेत. त्यामुळे सायंकाळनंतर शेतात जाणे अथवा घराबाहेर पडणेही धोकादायक वाटत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने मनुष्यवस्तीच्या परिसरात नियमित गस्त वाढवावी, आवश्यक ठिकाणी पिंजरे लावावेत आणि विशेष मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## लोणीतील जीवघेण्या हल्ल्याचा उलगडा मुख्य संशयित पोलिसांच्या ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**प्रवरानगर** : लोणी येथील ब्राम्हणे वस्ती परिसरात नागेश शंकर लोट (३८) यांच्यावर चाकू, तलवार व लोखंडी रॉडने हल्ला करून खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने मुख्य आरोपी गणेश उर्फ विकी आण्णासाहेब राक्षे (२८, रा. वेताळबाबा चौक, लोणी) याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत गुन्ह्यातील अन्य सात साथीदारांची नावे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. ५ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ८.१० वाजता नागेश लोट मोटारसायकलवरून घरी जात असताना ब्राम्हणे वस्ती येथे दोन मोटारसायकलींवरून आलेल्या चार ते पाच जणांनी त्यांना अडविले. त्यानंतर चाकू, तलवार व लोखंडी रॉडने डोक्यात आणि पाठीवर मारहाण करून गंभीर जखमी केले होते. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करण्यात आला. १६ सप्टेंबर रोजी विकी राक्षे लोणी येथील जनावरांच्या बाजारात पांढऱ्या रंगाच्या क्रेटा वाहनात असल्याची माहिती मिळताच पथकाने त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने



हल्ल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपास लोणी पोलीस करीत आहेत. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहभाग घेतला.

## तुकारामबाबा विद्यालयातील विद्यार्थ्यांना वाद्यांची भेट
### उमंग युवा शक्ती प्रतिष्ठानचा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**शिर्डी (प्रतिनिधी)** : कोपरगाव तालुक्यातील कुंभारी येथील उमंग युवा शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवर्य तुकारामबाबा विद्यालयातील विद्यार्थ्यांना तबला, पेटी व टाळ ही वाद्ये शालेय साहित्य म्हणून भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यालयात भक्तिमय व उत्साही वातावरण निर्माण झाले.



विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संगीत व कला क्षेत्रातील कौशल्य विकसित करता यावे आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. प्रतिष्ठानच्या 'माझा गाव, माझी जबाबदारी' स्वच्छता अभियानाचा येत्या रविवारी १५० वा रविवार पूर्ण होत आहे. अनेक रविवारपासून तरुणांकडून श्रमदानातून गावातील स्वच्छता व सार्वजनिक ठिकाणांची निगा राखली जात आहे. वाद्ये विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती गीते व गुणवत्ता विकास प्रमुख श्रीमती रणशूर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. यावेळी शिक्षक चिंधे यांच्यासह शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रतिष्ठानने यापूर्वी विद्यालयाला साऊंड सिस्टिम, व्याख्याने, पाणी शुद्धीकरण यंत्र, सौरऊर्जा व्यवस्था, बोअरवेल, संगणक प्रयोगशाळा, सीसीटीव्ही व व्यायाम साहित्य उपलब्ध करून दिले आहे. या उपक्रमांचे ग्रामस्थ व माजी विद्यार्थ्यांनी कौतुक केले.

## ममदापूर हादरले! गोवंश कत्तलीवर पोलिसांचा छापा; दोघे अंधारात पसार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**ममदापूर** : राहाता तालुक्यातील ममदापूर येथे गोवंशाची अवैध कत्तल सुरू असल्याची माहिती मिळताच लोणी पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई केली. पोलिस पथकाने घटनास्थळी छापा टाकून अंदाजे ६०० किलो गोमांस, कत्तलीसाठी वापरण्यात आलेली हत्यारे आणि होंडा कंपनीची चारचाकी, असा सुमारे ४ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांची चाहूल लागताच घटनास्थळी असलेले दोन संशयित अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास ममदापूर येथील रेहान मोहम्मद आयाज कुरेशी यांच्या घरासमोरील रस्त्याच्या पलीकडे गोवंशाची कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून लोणी पोलिसांचे पथक पंचांसह घटनास्थळी रवाना झाले.

रात्री सुमारे साडेबारा वाजता पोलिसांनी पायी घटनास्थळ गाठून छापा टाकला. त्यावेळी दोन इसम गोवंशाची कत्तल करताना दिसून आले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच रेहान मोहम्मद आयाज कुरेशी आणि मुहम्मद कुरेशी, दोघेही रा. ममदापूर, ता. राहाता, हे अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

घटनास्थळी पोलिसांना गोवंश जातीच्या जनावरांचे कत्तल केलेले गोमांस आढळून आले. तसेच मांस कापण्यासाठी वापरण्यात आलेली एक कुऱ्हाड, दोन सु-या आणि एक कोयता, यासह चक-४३-अ-८८४७ क्रमांकाची होंडा कंपनीची चारचाकी जप्त करण्यात आली.

पोलिसांच्या पंचनाम्यानुसार, अंदाजे ६०० किलो गोमांसाची किंमत १ लाख २० हजार रुपये, तर चारचाकीची किंमत सुमारे ३ लाख ५० हजार रुपये आहे. कत्तलीचे साहित्य असा मुद्देमालही कारवाईत जप्त करण्यात आला.

गोमांस नाशवंत असल्याने पंचांसमक्ष त्याचे नमुने डीएनए तपासणीसाठी घेण्यात आले. नमुने प्लास्टिकच्या बरणीत ठेवून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी जागेवरच सील केले. उर्वरित गोमांस पंचांसमक्ष जमिनीत पुरून नष्ट करण्यात आले.या प्रकरणी रेहान मोहम्मद आयाज कुरेशी व मुहम्मद कुरेशी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित २०१५) मधील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आशिष चौधरी, ए. एस. आय. सूर्यभान पवार, पोलीस कॉन्स्टेबल पोपट भोईटे, साईनाथ राशिनकर व होमगार्ड यांनी केली. पुढील तपास अविनाश मकासरे करीत आहेत.

## पारनेर पोलीस ठाण्यात डांबून मारहाण
### पीएसआय हंडाळ यांच्यावर कारवाईची एसपींकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**निघोज** : पारनेर पोलीस ठाण्यात स्वतःची तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या संदीप ज्ञानेश्वर औटी यांना पोलिसांनी बेकायदेशीरपणे डांबून ठेवून मारहाण केली. तसेच तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकला आणि १० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी औटी यांनी पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित पोलीस उपनिरीक्षक हंडाळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

> पारनेर पोलीस ठाण्यात तक्रारदार संदीप औटी यांच्यासोबत घडलेला प्रकार गंभीर आहे. मारहाण, बेकायदेशीरपणे डांबून ठेवणे, तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणणे तसेच पैशांची मागणी केल्याचे आरोप झाले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. याबाबत आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करून सखोल चौकशी व दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करणार आहोत.
> **बाळासाहेब माळी (उपजिल्हाप्रमुख, शिवसेना)**

औटी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३ सप्टेंबर रोजी रात्री त्यांचे विलास गाडेकर व नवनाथ शिंदे यांच्यासोबत किरकोळ भांडण झाले. त्यानंतर रात्री ९.३० च्या सुमारास १५ ते २० जणांनी त्यांच्या दुकानात येऊन त्यांना, त्यांच्या पत्नीला, आईला व १५ वर्षीय मुलाला मारहाण केली. यावेळी दागिने तोडण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला आहे.नंतर औटी कुटुंबीय उपचारानंतर पारनेर पोलीस ठाण्यात गेले. पहाटे तक्रार घेतल्यानंतर पीएसआय हंडाळ यांनी आपल्याला पोलीस ठाण्यातील शेजारच्या खोलीत ठेवले. तसेच मारहाण करून तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप औटी यांनी केला आहे. दिवसभर पोलीस ठाण्यात ठेवून सायंकाळी पुरवणी जबाब घेण्यात आला. समोरच्या व्यक्तीकडून तक्रार दाखल होऊन अटक होऊ नये यासाठी १० हजार रुपये देण्याची मागणी केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणी ५ सप्टेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिल्याचे औटी यांनी नमूद केले आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून पीएसआय हंडाळ यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.